श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १३ अंक १, २, व ३.] चै. वै. जे. [ श. १८५८

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्,



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादक:—सुंदरराव दी. नवलकर

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| संपादकीय ... ... ... ... | १—२ |
| श्रीकृष्णशिष्टाई ... ... ... ... | ३—१० |
| श्रीसाईनाथांचें पद्यरूप स्तवन ... ... | ११—१६ |
| श्रीसाईनाथ कथाकरणहक ( कथा १ ली )... ... | १७—१९ |
| शिर्डीवृत्त ( मार्च १९३६ ते डिसेंबर १९३६ )... ... | २०—२५ |
| अनुभव ... ... ... ... | २६—२७ |
| सभामंडपनिधि ... ... ... ... | २८ |
| श्रीसाईसच्चरित अध्यात्मिक निरीक्षण ... ... | १—१२ |

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचा शके १८५५ सालचा जमाखर्च,
व १८५७ सालच्या पुण्यनिधि हिशोबापैकीं देणें-घेणें यांबद्दलचा नक्शा.


# विनंती

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, ज्यांनीं वर्गणी अद्यापि पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी, अथवा V.P. करण्याचें सुचवावें.

## कै. श्रीम्हाळसापति अंक

श्रीसाईसद्भक्तांच्या सोयीसाठीं कै. म्हाळसापति व कै. दीक्षित अंक वेगळे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. अनुक्रमें किंमत ३ व ४ आणे. तरी जिज्ञासूंनीं त्याप्रमाणें मागणी करावी, ही विनंती.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

श्रीसाईभुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल. —प्रकाशक

हा अंक उशीरानें निघण्याचें कारण शिर्डीसंस्थान कमिटीचा शके १८५५ चा आढावा आजपर्यंत कै. रा. आ. तर्खड ऑ. खजिनदार यांनीं प्रसिद्ध न केल्यामुळें त्याची नक्कल श्री. रामचंद्र रा. सामंत ऑ. खजिनदार यांजकडे ऑ. चिटणीस यांनी शके १८५६ व १८५७ चे आढावे तयार करण्याकरिता दिली होती, ती त्यांचेकडून श्री साईलीलेंत तो आढावा प्रसिद्ध करण्याकरितां अद्याप आलेली नाहीं, म्हणून दुसरी नक्कल तयार करी-पर्यंत वेळ लागत आहे. पुढील अंक लवकरच प्रसिद्ध होईल. —संपादक

# संपादकीय

मागील शके १८५७ चा जोड अंक १०।११ व १२ वर्ष १२ निघून आज चार महिने होऊन गेले, याबद्दलचीं कारणें श्रीसाईभक्तांना माहित आहेत. शिर्डी संस्थानच्या सांपत्तिक कारणामुळेंच हा शके १८५८ वर्ष १३ चा जोड अंक १।२ व ३ उशिरानें निघत आहे. हल्लीं वर्गणीदारांची संख्या एक हजारावरुन घटत घटत दोनशेंपर्यंत आली आहे. प्रत्येक भक्तानें निदान दोन दोन वर्गणीदार आणून देण्याचें मनांत आणलें, तर जी सध्या मासिक चालविण्यास तूट येते, ती न येतां अंक तीन-तीन महिन्यांनंतर प्रसिद्ध होण्याऐवजीं दर महिन्यास वेळेवर प्रसिद्ध करण्यास सुलभ होईल.

ज्या श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांनीं गेल्या सालचीं शके १८५७ ची वर्गणी रु. ३-६ अद्याप दिली नाहीं, ती त्यांनीं कृपा करुन भरण्याचें करावें. त्याचप्रमाणें चालू सालची व शके १८५८ ची वर्गणी रु. ३-६-० ज्यांनीं अद्याप भरली नाहीं, त्यांनींही ती कृपा करून भरण्याचें करावें. वर्गणीदारांस विनंती आहे कीं, त्यांनीं वर्गणी मनिऑर्डरीनें पाठविण्याचें करावें. ज्यांच्याकडून जानेवारी १९३७ अखेर वर्गणी येणार नाहीं, त्यांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल.

श्रीसाईभक्तांनीं आपले अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपा करुन पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होण्याबद्दल संकोच वाटत असेल, तर त्यांनीं टोपण नांवाखालीं आपले अनुभव पाठवावेत; म्हणजे त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचें नांव प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं.

ह. भ. प. श्री संतसत्कविवर्य दासगणू महाराज यांचें भगवद्भक्तशिरोमणि बालसंत श्रीनामदेवचरित्र आख्यानाची प्रत श्री. विठ्ठल लक्ष्मण सुबंध, प्रकाशक, यांच्याकडून अभिप्रायार्थ आली आहे. त्याची किं. ०-८-० असून प्रस्तावना श्री. श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर, प्रोफेसर, फर्ग्युसन कॉलेज, यांनीं लिहिली आहे. दासगणू महाराज यांजसारखे प्रासादिक संतकवि यांनीं श्रीनामदेव भगवद्भक्ताचें चरित्र कीर्तनाख्यानरूपानें गोड, प्रेमळ व रसाळ भाषेंत लिहून त्यांतील प्रसंगवर्णनें अत्यंत हृदयस्पर्शी रीतीनें प्रतिबिंबित केलीं आहेत. साधारण जनसमूहास समजण्यासारखी साधी व रसाळ पद्यरचना व

प्रासादिक वाणी या कारणानें त्यांच्या कीर्तनास भाविक लोकांची गर्दी होते. या चरित्रानें संतकीर्तनाचा प्रभाव व ईश्वरावरील शुद्ध भाव यांचा वाचक जनांवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांतील देवाकडून दुधच्याा नैवेद्याचें प्राशन करून घेणें वगैरे प्रसंगांचें हुबेहुब रीतीनें वर्णन केलें आहे, ह्याचा मनावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं व त्या शुद्ध भक्तीचा प्रभाव हृदयावर चटकन ठसतो. महाराज यांनीं त्याचीं श्री. जनाबाई, श्री तुकाराम वगैरे संतांचीं कीर्तनाख्यानें प्रसिद्ध करावींत; म्हणजे अलीकडील कांहीं स्वैराचारी वाङ्मयाकडे लोकांच्या मनाची धांव घेत आहे त्याला आळा बसेल व अशीं चरित्रें लोकांचीं मनें भक्तिमार्गाकडे ओढतील.

ह्या अंकांत रावबहादूर वासुदेव अनंत बांबर्डेकर यांचा श्रीकृष्णशिष्टाईचा लेख संवादरूपाने प्रसिद्ध केला आहे, तो वाचकवर्गास पसंत पडेल. त्याचप्रमाणें पुणें येथील डॉक्टर श्यामसुंदर शंकर तेंडुलकर यांचें श्रीसाईसच्चरित्र अध्यात्मिक निरीक्षण "सुमनसुंदर" या टोपण नांवाखालीं प्रसिद्ध करण्यांत आलें आहे तेंही श्रीसाईभक्तांना पसंत पडेल व तें पुस्तकरूपानें निराळें छापतां यावें म्हणून त्याला निराळीं पानें दिलीं आहेत. शिर्डी येथील श्रीसाईभक्त श्री. जी. व्ही. क्षीरसागर, हेड-सिम्नलर, गोदावरी कॅनल, यांच्या श्रीसाईबाबांबद्दलच्या प्रेमळ कविताही या जोडअंकांत प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत.

# श्रीकृष्ण-शिष्टाई

## प्रथम दृश्य

( पांडवशिबिर )

(युधिष्ठिर, भीम, अर्जुन आदि पांडवांसहित **श्रीकृष्ण** सेनानिरीक्षण करीत येत आहेत.)

**युधिष्ठिर**—केशवा ! युद्धाची संपूर्ण तयारी झालेली तूं पाहिलीच आहेस. आतां आम्हला आपली आज्ञा काय ती सांगावी.

**कृष्ण**—बराच वेळ मी विचार करीत आहें, धर्मराज ! परंतु कर्तव्य काय तें अद्यापि माझ्या ध्यानीं येत नाहीं.

**अर्जुन**—कर्तव्य ? प्रभु, आतां विचार करण्याची आवश्यकता काय ? आतां युद्धक्षेत्राकडे चालून जाण्याची आम्हांला आज्ञा द्या. आजवर शांति राखून आम्ही जे असह्य क्लेश सहन केले, ते आपणास माहित आहेतच.

**कृष्ण**—हें ठीक आहे, पार्था ! पण युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी मी स्वतःच एक वेळ हस्तिनापुराला जाऊं इच्छित आहें.

**युधिष्ठिर**—जनार्दना, तें कशासाठीं ?

**कृष्ण**—तुम्हां पांडवांच्या वतीनें कौरवांना संधीचा संदेश पोंचविण्यासाठीं.

**भीम**—संधि-संदेश ? आणि आमच्या वतीनें ?

**कृष्ण**—होय—वृकोदरा, संधीचा संदेश, आणि तो तुम्हां पांडवांचा म्हणून.

(द्रौपदी प्रवेश करते.)

**द्रौपदी**—पण मी तुम्हाला कदापि जाऊं देणार नाहीं.

**कृष्ण**—शांत हो, द्रौपदी, शांत हो.

**द्रौपदी**—शान्ति कसची मधुसूदना ? आपली प्रतिज्ञा विसरून भीम आणि अर्जुन ह्या दोघांनीं जरी आपल्या शान्तिकार्याला प्रतिबंध केला नाहीं, तरी माधवा, मी करीन ! भरसभेंत माझे केश ओढून ज्या पाप्यांनीं मला लज्जित केलें, त्यांचा बदला मी अवश्य घेईन. जरी माझे पति आणि आपण त्या दुष्टांचा वध करण्यास असमर्थ

झालां, तरी कांहीं चिंता नाहीं. मी कांहीं निर्बल नाहीं. अभिमन्यूला पुढें करून माझे पांच पुत्र माझ्या अपमानाचा बदला घेतील. ( द्रौपदी रडूं लागते. )

**कृष्ण**—हां, हें काय कल्याणी ! रडतेस ? तूं वीर-पत्नी, तुला रडणे शोभत नाहीं, द्रौपदी.

**द्रौपदी**—केशवा, मी आजपर्यंत कधींच रडलें नाहीं. पण आपण कौरवांकडे आमच्या वतीनें शिष्टाईस जात असल्याचें ऐकून माझें हृदय विदीर्ण होत आहे.

**कृष्ण**—कदाचित् सन्धि झाला तर तो सन्मानपूर्वकच होईल; तूं निश्चित राहा, द्रौपदी.

**द्रौपदी**—पण सन्धीच्या गोष्टी बोलतांना पापी दुःशासनाच्या हातांनीं खेचले गेलेल्या ह्या माझ्या मुक्त केशांना विसरूं नका, यदुपते ! ( आपले काळेभोर केश डाव्या हातानें पुढें करून )—त्या दिवसापासून मोकळे ठेवलेले हे केश दुःशासनाच्या रक्तानेंच भिजवून त्यांची वेणी घातली जाईल हें ध्यानीं असूंद्या. समुद्रांतील वडवानलाप्रमाणें रागाला पोटांत ठेवून मीं हीं तेरा वर्षे काढलीं आहेत.

( द्रौपदी आवेशांत निघून जाते. )

**युधिष्ठिर**—वासुदेवा, तुझें हितावह भाषण सुद्धां दुर्योधन ऐकणार नाहीं, म्हणून तूं त्या ठिकाणीं जावें हें मला बरें दिसत नाहीं. तुझ्यावरच एखादा भलतासलता प्रसंग ओढवेल अशी भीति वाटते.

**कृष्ण**—दुर्योधनाची पापबुद्धि मी ओळखतों. परंतु असें केल्यानें राजेलोकांच्या अपवादापासून आपण मोकळे होऊं. युधिष्ठिरा, तुम्ही जाणून असा कीं, सिंहापुढें ज्याप्रमाणें यःकश्चित् मृगाची डाळ शिजत नाहीं, त्याप्रमाणें कौरवसभेंतील सर्व राजे एकवटले, तरी त्यांच्या हातून माझें कांहीं वांकडें व्हावयाचें नाहीं. पण तसा प्रसंग आल्यास मी स्वतः जाऊन सर्व कौरवांचा फडशा उडवीन. माझें तेथें जाणें केवळ व्यर्थ होईल असें मला वाटत नाहीं. कदाचित् आपला कार्यभाग न साधला तरी लोकापवादापासून आपण मुक्त होऊं.

**युधिष्ठिर**–ठीक आहे; कृष्णा, तुला बरें वाटेल तसें कर. तूं आमचा भाऊ व सखा असल्यामुळें आम्हांला आतां बिलकुल काळजी नाहीं.

---

## द्वितीय दृश्यः

( दरबारचा मार्गः धृतराष्ट्र आणि विदुर. )

**धृतराष्ट्र**—विदुरा, मोठी आश्चर्याची गोष्ट कानावर आली आहे कीं तो पराक्रमी दाशार्ह पाण्डवांच्या वतीनें हस्तिनापुरांत आला आहे म्हणून. गोष्ट खरी काय ?

**विदुर**—हां महाराज, गोष्ट खरीच आहे.

**धृतराष्ट्र**—तर मग त्यांच्या स्वागताची उचित व्यवस्था केली जात आहे ना ?

**विदुर**—होय महाराज ! स्वारी हस्तिनापुरीं श्रीकृष्ण-स्वागतार्थ तयार झालेली दिसत आहे. राजमार्ग सुंदर रीतीनें सजविले असून, स्त्री-पुरुषांच्या गर्दीमुळें रस्ते बंद होत आले आहेत.

**धृतराष्ट्र**—ठीक आहे, विदुरा. महात्मा श्रीकृष्ण याहीपेक्षां अधिक सत्काराला पात्र आहेत. ते दरबारांत आल्यावर त्यांना कुरुवंशाच्या कोषांतून कांहीं अमूल्य मणि व रत्नें, तसेंच सुवर्णालंकारांनीं उत्तम शृंगारलेले बाल्हिक[1] अश्व आणि हत्ती, रथ, दास-दासी, उंची ऊर्णवस्त्रें, चीनें[2] देशचीं अजिनें, आणि अहोरात्र चमकणारा हा मणि हीं सर्व नजरणा म्हणून देण्याचें माझ्या मनांत आहे.

**विदुर**—तो कशासठीं महाराज ? त्या महा पुरुषाला रत्नादिकांची भेट देऊन आपल्या पक्षाला सामील करून घेऊं इच्छितां काय ? तर मग आपला हा उद्योग व्यर्थ जाईल हें ध्यानांत ठेवा. आदर-सत्कार करून आणि मणि-रत्नें देऊन श्रीकृष्णाला पांडवांपासून फोडतां येणें अशक्य आहे. त्या माननीयाला जें आतिथ्य प्रिय आहे तें मात्र त्याला द्या.

(इतक्यांत कोलाहल ऐकूं येतो)

धृतराष्ट्र आणि कृष्ण येत आहेत, चला. दरबारमध्यें बसूनच बोलणीं होतील.

( प्रस्थान—शकुनि आणि दुःशासन यांसहित दुर्योधन प्रवेश करतो. )

**दुर्योधन**—माझ्या वाड्यांत शत्रूच्या दूताचा इतका आदर ? दुःशासना, हें सर्व काय चाललें आहे ?

**दुःशासन**—मी काय सांगूं, दादा ! आजोबा आणि बाबा आमचा किती अपमान करूं पाहत आहेत, समजत नाहीं.

**दुर्योधन**—पण दुःशासना, त्यांच्या करण्यानें कांहींही होऊं शकणार नाहीं ! कृष्ण इकडे कां येत आहे तें मी पूर्णपणें जाणून आहें. परंतु ह्या दुर्योधनाच्या सम्मती-शिवाय येथें पान सुद्धां हालूं शकत नाहीं हें त्याला माहित नसावें.

---

१ बल्ख—बॅक्ट्रिआ. २ हरिणांचीं कमावलेलीं कातडीं. भारतकालीं जशीं हिंदुस्थानांत येत असत, तशींच रेशमी वस्त्रेंही येत असत. आजच्या अमत्त्या सौवळ्याला **कौषेय-वस्त्र** असें नांव आहे. तें मूळचें चीन देशांतून इकडे आलें होतें. त्या देशावरून त्याला **चीनांशु** असें नांव प्राप्त झालें.

**शकुनी**—हें पाहा, मला एक निराळीच युक्ति सुचली आहे.

**दुर्योधन**—ती कोणची, मामा ?

**शकुनी**—प्रसंग साधून किंवा कपटानें किंवा जबरदस्तीनें कृष्णाला येथें कैद करून ठेवावें, म्हणजे युद्धाची आपत्ति दूर होईल. कारण कृष्णाशिवाय पाण्डव युद्धक्षेत्रांत पाय टाकण्याचें साहस करणार नाहींत, हें खास.

**दुर्योधन**—वाः मामा ! ही तर दूरवर विचार करून योजलेली युक्ति आपण सांगितली ! ( इतक्यांत गलबला ऐकूं येतो ) कृष्ण दरबारांत येऊन पोंचला असें वाटतें. चला, नाहीं तर आम्ही पोंचविण्यापूर्वीच बाबा कांहीं तरी अनर्थ करून बसावयाचे ! ( ते जातात )

पडदा बदलतो.

---

## दरबार

( श्रीकृष्ण दरबारांत प्रवेश करीत आहेत, आणि सर्व मंडळी त्यांना उत्थापन देत आहे.)

**धृतराष्ट्र**—आसनस्थ व्हा भगवन् ! कुरुवंश आपलें अभिवादन करीत आहे.

**कृष्ण**—आलों राजन् ; आपणही आसनस्थ व्हावें. ( कृष्ण एका उच्चासनावर बसल्यानंतर सर्व मंडळी बसते )

**धृतराष्ट्र**—यादवश्रेष्ठा, आपल्या आगमनानें आज ही हास्तिनापुरी धन्य झाली आहे. येतांना मार्गांत आपल्याला कांहीं कष्ट तर झाले नाहींत ना ?

**कृष्ण**—नाहीं महाराज ! कष्ट कसचे ? आणि कदाचित् कष्ट झाले, तरी त्यांची कोण पर्वा करतो ? माझें जीवन धर्मरक्षणार्थ कष्ट सहन करण्यासाठींच आहे.

**धृतराष्ट्र**—यांत काय संदेह, भगवन् ? बोला, आज कोणच्या हेतूनें येथें येण्याची आपण कृपा केलीत ?

**कृष्ण**—कुरुश्रेष्ठा, आपण सर्व कांहीं जाणतच आहां ! पण माझ्या मुखावाटेंच ऐकण्याची इच्छा असल्यास सांगतों. मी पांडवांच्या वतीनें संधि-संदेश घेऊन दूतरूपानें आलों आहें. आपण पांडवांना अर्धें राज्य देऊन त्यांच्याशीं संधि करावा, अशी माझी इच्छा आहे.

**दुर्योधन**—( उभा राहून ) संधि कसचा, केशवा ! युधिष्ठिरानें वनवासाच्या प्रतिज्ञेचा भंग करून आपलें राज्य गमावलें आहे. त्याचा आतां राज्याशीं संबंध काय ?

**कृष्ण**—दुर्योधना, असें भलतेंच बोलूं नकोस ! युधिष्ठिराला त्याच्या जन्मसिद्ध हक्कापासून वंचित करून रक्तपात करण्याचें पाप आपल्या मस्तकावर घेऊं नकोस.

**दुर्योधन**--पाप ? कोणचें पाप, केशवा ? मी क्षत्रिय आहें. युद्धक्षेत्रांतील रक्ताच्या नदींत स्नान करणें म्हणजे तीर्थक्षेत्रांत केलेलें पुण्यस्नानच मी समजतों.

**भीष्म**--दुर्योधना, तूं मोठीच चूक करीत आहेस. समरक्षेत्रांतला रक्तपात धर्म आणि देश यांच्या रक्षणार्थ झाला, तरच तो न्याय्य म्हटला जात असतो. अधर्म आणि अनर्थ यांचा तो पोषक होतां कामा नये.

**दुर्योधन**--तर काय ह्या युद्धामध्यें मी अधर्माचें पोषण करीत आहें ?

**धृतराष्ट्र**--तुला हें समजण्यासारखें नाहीं बेटा; धर्माधर्माचा ज्ञाता महात्मा कृष्णाशिवाय दुसरा कोण आहे ?

**दुर्योधन**--पण ते पांडवांचे पक्षपाती असल्यामुळें, त्यांच्या सांगण्यावर माझा विश्वास नाहीं.

**द्रोणाचार्य**--शान्त हो, दुर्योधना ! गुरुजनांपुढें अधिक बोलणें चांगलें नाहीं.

**धृतराष्ट्र**--( कृष्णाला उद्देशून ) क्षमा करा द्वारकाधीश ! दुर्योधनाच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका.

**कृष्ण**--तें ठीक आहे कुरुराज ! पण पुत्रमोहामुळें आपण अन्याय्य बाजूला जखडले जात असल्याचें मला दिसत आहे. आपल्या सांगण्याबाहेर दुर्योधनाला आपण वागूं देतां, हें चांगलें नव्हे.

**द्रोणाचार्य**--दुर्योधना अजून समय गेलेला नाहीं. कृष्णासारख्या महापुरुषाच्या कल्याणकारी उपदेशाचा शान्त चित्तानें विचार कर. अर्जुनाच्या गांडीव धनुष्याची प्रत्यंचा चढण्यापूर्वी कांहीं निर्णय झाल्यास बरें.

**दुर्योधन**--गुरुदेवा, ह्या प्रश्नाचा मीं चांगला विचार केला आहे. अर्जुनाचें गाण्डीव आणि भीमाची गदा यांची भीति ह्या आपल्या शिष्याला-कधीं स्वप्नांत सुद्धां वाटलेली नाहीं. पितामह भीष्म, आपण आणि कर्ण यांना पाण्डवच काय, पण सुरेंद्र सुद्धां जिंकूं शकणार नाहीं. पाण्डवांना सुईच्या अग्राइतकी भूमि देण्यापेक्षां रणांगणांत शरशय्येवर कायमचा विसावा घेणें अधिक उत्तम असा माझा निश्चय ठरला आहे.

**कृष्ण**--जर वीरांच्या मृत्युशय्येवर पडण्याची तुझी इच्छा असेल, तर तीही पूर्ण होईल; परंतु, दुर्योधना ! लक्षांत ठेव, कीं ह्या युद्धाचें उत्तरदायित्व तुजवर पडेल आणि भारतभूमीला निर्वीरक करणारा अपराधी तूंच होशील !

**दुर्योधन**--माधवा, त्याची मला चिन्ता नाहीं ! आपल्या ह्या वक्तव्यांत घाबरणारा मनुष्य मी नव्हे. राज्य म्हणजे कांहीं मातीचें खेळणें नव्हे, कीं जें दुसऱ्याला सहज देतां येईल. सुईच्या आग्राइतकीसुद्धां जमीन मी पाण्डवांना देऊं इच्छित नाहीं.

**कृष्ण**—कुरुराज ! युद्ध अवश्यमेव होणार हें ठरलेंच. प्रभूची इच्छा. माझें कर्तव्य मीं केलें आहे. बरें तर, मी आतां जातों. ( कृष्ण उठतात. तोंच दुर्योधन पुढें येऊन कृष्णाला पकडूं पाहतो. आणि त्याची हालचाल पाहून कृष्ण हंसतो) हः हः हः दुर्योधना, मला बन्दीवान करूं पाहत आहेस होय ? ( सर्व सभा चकित होऊन पाहत आहे ) शन्तिदूताशीं असें वर्तन ? छिः, कृष्ण एकाकी आहे असें समजून हें साहस करीत आहेस; परन्तु तो कधीं एकटा राहत नसतो; त्याचे दैवी रक्षक त्याच्याबरोबर असतात, समजलास ?

[ **अशरीरी वाणी** ऐकूं येते. "योगेश्वर भगवन् श्रीकृष्णाचा अद्भुत चमत्कार प्रकाशित होत आहे पाहा." सर्वांना दिसून येतें कीं, शस्त्रास्त्रांनीं सुसज्जित पांच पाण्डव कृष्णाच्या मागें उभे आहेत; कृष्ण अनेक आहेत, तेव्हां धरावें कोणाला ! कृष्ण निघून जातात. दरबारी आश्चर्यचकित होतात. ]

---

## तृतीय दृश्य:

( कुन्तीचा महाल: कृष्णआणि सात्यकी )

**कृष्ण**—सात्यकी, मी ज्या कामासाठीं गेलों, तें पुरें झालें. रक्तपाताशिवाय पांडवांना त्यांचा जन्मसिद्ध हक्क देण्याला दुर्योधन तयार नाहीं, हें नक्की ठरलें.

**सात्यकी**—देवा, आपण शिष्टाईला जाण्यापूर्वीच मीं हें सांगितले होतें.

**कृष्ण**—तें ठीक आहे, सात्यकी ! परन्तु आतां माझ्या जाण्यामुळें भावी युगामध्यें ह्या रक्तपाताबद्दल मला कोणी दोषी तर ठरविणार नाहीं ! जर मी संधिकार्यार्थ गेलों नसतों, तर जनता म्हणती कीं, कृष्णाच्या मनांत असते तर भारतभू वीरहीन होण्यापासून बचावली असती.

**सात्यकी**—भगवन्, आपलें म्हणणें खरें आहे. आतां त्वरेनें येथून आम्ही प्रस्थान केलें पाहिजे. पांडव आमची मार्गप्रतीक्षा करीत असतील.

**कृष्ण**—ठीक आहे; पण माझी आते—पाण्डवांची जननी—कुन्तीदेवी इला भेटून गेलें पाहिजे. ( कृष्ण कुन्तीला आते आते म्हणून हाका मारतो. )

**कुन्ती**—कोण येतंय ? यदुनाथ ? बस, माधवा, बस. आधीं सांग कीं, माझे पुत्र निर्भय असून आनंदांत आहेत ना ? ( कृष्ण कुन्तीच्या पायांवर डोके ठेवतो. )

**कृष्ण**—देवी, त्यांचें अनिष्ट कोण करूं शकणार ? तुझ्या आशीर्वादानें ते अजेय आहेत.

**कुन्ती**—बरें, पण आज तुझें इकडे येणें कां झालें ?

**कृष्ण**—तुझ्या पुत्रांच्या वतीनें सन्धि-संदेश घेऊन कौरवांकडे आलों होतों.

**कुन्ती**—कृष्णा, हे काय सांगत आहेस ! माझ्या पुत्रांचें क्षत्रियत्व नष्ट झालें काय ? पूर्वी कुबेरानें प्रसन्न होऊन राजर्षि मुचुकुन्दाला ही पृथ्वी दिली असतां " मी आपल्या बाहुबलानें मिळालेल्या राज्याचाच उपभोग घेऊं इच्छितों. " असें स्पष्ट सांगून त्यानें ती घेतली नाहीं. मी तर त्या दिवसाची वाट पाहत आहें कीं, माझे वीर पुत्र पाप्यांचें निर्दालन करून आपली प्रतिज्ञा पुरी करूनच ज्या दिवशीं मला भेटावयास येतील.

**कृष्ण**—तो समय जवळ येत आहे, आत्याबाई ! कौरवांनीं सन्धि करण्याची सूचना झिडकारून टाकली !

**कुन्ती**—सौभाग्य ! महासौभाग्य ! तर मग कृष्णा, लवकर जा, आणि माझ्या पुत्रांना पुढील कार्यासाठीं सज्ज कर.

**कृष्ण**—बरें तर मी जातों, आत्याबाई. मुलांना कांहीं सन्देश द्यावयाचा असल्यास सांगा.

**कुन्ती**—होय ! युद्धक्षेत्रांत जाण्यापूर्वीं माझ्या मुलांना एक संदेश द्यावयाचा आहे. त्या वीरांना सांग कीं, आज चौदा वर्षें मी त्यांना पाहिलेलें नाहीं. ते मला व मी त्यांना मुकल्यासारखीं झालों आहोंत. त्या धर्मात्म्या युधिष्ठिराला सांग कीं, तुझ्या धर्माचें अवडंबर आतां पुरे झालें. तुझ्या ह्या मातेला पोटासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागतें; तेव्हां तिचें जिणें व्यर्थ आहे. तसेंच त्या धनंजयाला व नेहमीं एका पायावर तयार असणाऱ्या वृकोदराला आणि क्षात्रधर्माला जागणाऱ्या माद्रीच्या पुत्रांना सांग कीं, क्षत्रियकन्या ज्या प्रसंगासाठीं गर्भधारणा करते, तो समय आतां प्राप्त झाला आहे. आतां प्राणांची देखील पर्वा कामाची नाहीं. कौरवांनीं कपटानें राज्य बुचाडून तुम्हांला वनवासी केल्याबद्दल मला इतकें दुःख होत नाहीं. परंतु त्या साध्वी द्रौपदीला रजस्वला असतां भरसभेंत ओढून आणून जे अपमानकारक शब्द ऐकविले, ते माझ्या मनाला शल्याप्रमाणें बोंचत आहेत. अत्याचारीयांच्या भारानें वसुधा व्याकुल झाली आहे, अधर्मीयांकडून जबरदस्तीनें धर्माची मर्यादा नष्ट-भ्रष्ट केली जात आहे. बालपणीं मातेचें दूध पिऊन मिळविलेली शक्ति आतां जगाच्या निदर्शनास आणा आणि दुष्ट अत्याचारीयांचे निर्दालन करून भारतांत धर्म आणि शांती यांची स्थापना करा.

**कृष्ण**—आते, तुझ्यासारखी सुज्ञ सीमंतिनी दुसरी कोण आहे ? बरें, आणखी कांहीं कार्य सांगावयाचें आहे ?

**कुन्ती**—केशवा, तुला फार महत्त्वाचें काम सांगावयाचें आहे. धर्म आणि अधर्म या दोहोंमधील त्या भीषण युद्धांत तुला धर्माचा पक्ष स्वीकारावा लागेल. माझ्या पांच पुत्रांना तुझ्या स्वाधीन करून त्यांच्या रक्षणाचा भारही तुझ्यावरच सोंपवीत आहें. बोल तर मग; माझ्या विनंतीचा स्वीकार केलास ना ?

**कृष्ण**—कां नाहीं करणार, देवी ? धर्म आणि न्याय पांडवांच्या बाजूस आहेत, आणि **ज्या ठिकाणीं धर्म त्या ठिकाणीं कृष्ण** असणार हें निश्चित आहे.

**कुंती**—(हर्षित होऊन) आणि **ज्या ठिकाणीं कृष्ण त्या ठिकाणीं विजय** ठेवलेला आहे, हें पण निश्चित समजावें.

कुंती आदरानें श्रीकृष्णाला वंदन करूं पाहते. परंतु कृष्ण तिला मध्येंच हरकत करतो व उलट तिला तीन प्रदक्षिणा करून निघून जातो. ( तोंच बाहेर कोलाहल ऐकूं येतो) **बोला, भारत रंगभूमीचे एकमात्र सूत्रधार वीराग्रणी श्रीकृष्णाचा जयजयकार असो.***

* महाभारताच्या उद्योगपर्वातील ह्या कथानकांत किंचित् फरक करून हा संवाद लिहिला आहे, तो श्री साईबाबांच्या चरणीं अर्पण करतों.

“ वासुदेवशर्मा. ”

ॐ

## ॥ श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

### आर्या

श्रीसाई स्फूर्ति वदला गंगाधरदास तनय विष्णूचा ॥
क्षीरसागर उपनामक, जन्म, कुलीं जाहला असे ज्याचा ॥ १ ॥
विनती करितो चिटणीस श्रीसाईसंस्थानप्रभृतिला ॥
द्यावें अल्प स्थलाला छापुनि खालील साई-पद्यांला ॥ २ ॥

### श्लोक

आशा असे मज बहू म्हणुनी तुम्हासी ॥
करितों विनंती पद्यां छापावयासी ॥
गंगाधरासि वदवी श्रीसाईनाथ ॥
छापाल साईस्तवनामृत मासिकांत ॥ ३ ॥

### दिंडी

मानितों मी आभार बुधजनांचा ॥
व्यवस्थापक आणि सुज्ञ चिटणीसांचा ॥
पद्यरूपी चतुर्विंशती सुमनमाला ॥
अर्पिली मी श्री साई समर्थाला ॥ ४ ॥

## ॥ श्री सद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

( १ )

भूपराग

नमुनी प्रथम गजानना ॥ माया नमिली—
मयुर—वाहना ॥ ध्रु० ॥
मुक्तिदाता श्री गुरुसाई ॥ भावें वंदिला मी
लवलाही ॥ तत्पदकमलीं ठेवुनी होई ॥
गंगाधर करित प्रार्थना ॥ १ ॥ नमुनी ॥

( २ )

( चाल—सत्य वदे वचनाला ॥ )

स्फूर्ती द्यावी या दासाला ॥ तव गुण यश
कीर्ती गायाला ॥ ध्रु० ॥
वंदन करितों श्री साईला ॥ मोचन करि जो भव
बंधाला ॥ तोडुनियां प्रभु यमपाशाला ॥
रक्षी गंगाधर दासाला ॥ १ ॥ स्फूर्ती ॥

(३)

( चाल—धीट लंगरवा० )

प्रथम नमन तुजला ।। साई ।। करद्वय जोडुनी
सह अष्टांगीं, माथा पदीं ठेविला ।। साई ।। धृ० ।।
तव यश गाया स्फूर्ती द्यावी ।। मनिषा माझी तृप्त करावी ।।
दासा करवीं सेवा घ्यावी। विनती ही तुजला ।। साई ।। १ ।।
जाति सुमनांचा हार गुंफिला ।। साई कंठीं अर्पण केला ।।
तव मुख निरखुनी जन वृंदाला ।। मोद बहु झाला ।। साई ।। २ ।।
विनवी गंगाधर श्री साईला ।। ठाव पदीं दे या दासाला ।।
चुकवी दुःखद भवतापाला ।। साई जगत्पाला ।। साई ।। ३ ।।

(४)

( चाल—मनमोहन सांवळा० )

श्री साईनाथ प्रगटला ।। शिर्डी ग्रामीं राहिला ।। धृ० ।।
कौपीन कफनी वसनें घालुनी ।। मागे भिक्षेला ।। १ ।।
काम मदादिक षड्रिपु जाळुनी ।। पेटविलें धुनीला ।। २ ।।
विष्णुतनय गोविंदाग्रज ।। सेवा चरणाला ।। ३ ।।

(५)

( चाल—अविनाशि हा० )

परवर दिगार साई ।। तुमको मेरी अर्जी सुन लेना ।।
बंदे गुलाम के, दासके सीसपर ।। हात धर देना ।। १ ।।
बंदा तुमारा अज्ञ गंगाधर ।। धरत सीस चरना ।। २ ।।

(६)

( चाल—प्रेम सेवा० )

श्री साई सेवा चरण ।। सतत लाधो मला ।। धृ० ।।
मम तोडी भव बंध ।। लागो तुझा छंद ।।
ठाव पदीं देई मज ।। पतित दीना ।। १ ।। साई ।।
श्री साई सच्चिदानंद ।। देई चित्सुखानंद ।।
स्वामी गंगाधराचा ।। विबुधांजना ।। २ ।।

(७)

( चाल—पांडु नृपति० )

श्री साई नाथ पाहूं चला ।। कलि युगीं प्रभु
अवतरला ।। भक्तासी ताराया ।। शिर्डीसी आला ।। धृ० ।।
अज्ञ नीच दुष्टांनीं ।। नोळखीला प्रभु कोणी ।।
पिसा फकीर मानोनी ।। प्रभू गांजिला ।। १ ।।
गार म्हणुनी चिंतामणी ।। सांडियला दुष्टांनीं ।।
लाधली जशी कामधेनू ।। अभाग्याला ।। २ ।।

छंदा घेई गंगाधर ॥ मूर्ती बघण्या अतुर ॥
होई निशिदिनि तत्पर ॥ सेवी बाबांला ॥ ३ ॥

( ८ )

( चाल—व्रिजलाला गडे० )

चला पाहूं चला ॥ साईला ॥ शिर्डीसी आला ॥ धृ० ॥
पार जयाचा नसे कुणाला ॥ कोठुनी प्रभू आला ॥
शिर्डीला ॥ चला पाहूं चला ॥ १ ॥
अखिल जगाचा व्यापक झाला ॥ व्याप हि ना कसला ॥
प्रभूला ॥ चला पाहूं चला ॥ २ ॥
अष्टादश शत चत्वारिंशत् ॥ शक समाधीला ॥
प्रभूच्या ॥ चला पाहूं चला ॥ ३ ॥
विष्णू तनय गंगाधर घाली ॥ दृढ मिठी–
चरणाला ॥ साईच्या ॥ चला पाहूं चला ॥ ४ ॥

( ९ )

( चाल—माया आपकी० )

वेड लागलें ॥ साई ॥ सगुण रूप मज ना दिसलें ॥ धृ० ॥
पूर्ण ब्रह्म सद्गुरु साई  अति पवित्र द्वारका भाई
पाहण्यासि मन तळमळे ॥ वेड ॥ १ ॥
गंगाधर चातकासी ॥ साइ दयाघन वृष्टीसी
करुनी कृपाजल पाजिलें ॥ वेड ॥ २ ॥

( १० )

( पद चाल—रुसलासी हरि० )

शिर्डीचा प्रभू देखिला ॥ भक्तासाठीं सदा तिष्ठला ॥ धृ० ॥
उष:कालीं काकड आरती ॥
प्रेम भावें मंगल आरति ॥
त्रिकाल पूजन अर्चन करिती ॥
गंगाधर करी चरणीं प्रीती ॥ भावें वंदिला ॥ १ ॥

( ११ )

( चाल—सोडी न मी तुज रमा० )

सेवीन मी साइनाथा ॥ सकल जगत् त्राता ॥ धृ० ॥
हिंदू यवन एक रीती ॥ श्री मूर्ती पूजीती ॥
त्यजुनी द्वैत भावा ॥ सेवीन मी ॥ १ ॥
मित्र होत गज केसरी ॥ गरुड प्रीति शेषावरी ॥
सकल तव ही सत्ता ॥ सेवीन ॥ २ ॥

विष्णू तनय गंगाधर ॥ मानी सकळ जग असार ॥
पूजीं साई समर्था ॥ सेविन ॥ ३ ॥

( १२ )

( चाल—या नव नवल नयनोत्सवा० )

या तव बघुनी कमलानना ॥ साई ॥ मोद बहू मज होई प्रभुजी ॥
सेवाया तव चरणां ॥ या तव ॥ धृ० ॥ प्रेमा देई चरण चुराया ॥
भव सिंधू उतराया ॥ साधन याविण अन्य असेना ॥
म्हणुनी वंदित चरणां या तव ॥ १ ॥
विनंती मानी, पदरीं घेई ॥ गंगाधरा लवलाही ॥
तवपद परिसें मम लोहांगा ॥ केलें शुद्ध सुवर्णा ॥ या तव ॥ २ ॥

( १३ )

( चाल—नरवर कृष्णा समान० )

साई पद युग्मा समान ॥ नाहीं ॥ धृ० ॥
साधन दुसरें पार तराया ॥ बिकट वाट
यम घाट चढाया ॥ कृतांत जिंकाया ॥ साई ॥ १ ॥
अनुभवी गंगाधर ॥ चित्सुख निरंतर ॥
पदीं रमला, सदा रंगला ॥ भव नदी उतराया—
॥ साई पद ॥ २ ॥

( १४ )

( चाल—राग मुलतानी० )

सेवा सतत करी ॥ साइची ॥ भवभय हारक,
अघ संहारक ॥ विमल कीर्ती ज्याची ॥ धृ० ॥
प्रभुपद सेवी निशिदिनी भावि ॥ मुक्ती सोपाना
ते पावे ॥ साधन सुलभ बहु हेची ॥ सेवा ॥ १ ॥
दास गंगाधर, जोडुनियां कर पूजी भावे,
गाई निरंतर ॥ कीर्ती श्री साईची ॥ सेवा ॥ २ ॥

( १५ )

( चाल—सत्य वदे० )

साई पदांबुज सेवी मनुजा ॥ मुक्तीचा नच
सोपान दुजा ॥ धृ० ॥
मेवा मिळवा या मुक्तीचा ॥ शोध नको करूं अन्य
युक्तीचा ॥ पाझर फटेल जैं भक्तीचा ॥ स्वस्वरूपीं
तव पंढरी राजा ॥ देखसी नयनीं सद्गुरु
राजा ॥ साइ पदांबुज ॥ १ ॥

विनवी गंगाधर सकलाला ॥ सत्य प्रचीती
अनुभवण्याला ॥ सोडुनी शंका साइसी भजा
जो पुरवितसे इच्छित काजा ॥ साइ पदां ॥ २ ॥

( १६ )

( चाल—दत्त गुरु दत्त गुरु )

साइ गुरु, साइ गुरु, साइ गुरु, जपत जा
अंतकालीं नरा सोडवीना दुजा ॥ धृ० ॥
प्रेम भावें मनीं ॥ मूर्ती हृदिं ठेवुनी ॥ बिल्व-
तुलसी दला ॥ साइ पदीं अर्पी जा ॥ साइ ॥ १ ॥
नित्य गुरुवारीं ॥ श्री साइ पूजा करी ॥ सतत
प्रभू गुण कथा ॥ गायना करीत जा ॥ साइ ॥ २ ॥
दास गंगाधरें ॥ अल्पमति वर्णिला ॥ तो प्रभू
साइबाबा ॥ सतत तुम्ही जपत जा ॥ साइ ॥ ३ ॥

( १७ )

( चाल— प्रेम भावें जीव० )

प्रेमभावें शरण जाइ प्रभुला ॥ शिर्डीसी अवतरला ॥
प्रभू जो ॥ प्रेमभावें ॥ धृ० ॥
नसती भिन्नमूर्ति ॥ साई आणि श्रयमूर्ती ॥
वारी भ्रम पटला ॥ प्रेमभावें ॥ १ ॥
सांडी भ्रमाला ॥ शिर्डीसी जाइ ॥
मूर्ती बघण्याला ॥ प्रेम भावें ॥ २ ॥
अनुभवा येइल ॥ सत्य दिसेल तुज ॥
साइ दत्तची अवतरला ॥ प्रेम भावें ॥ ३ ॥
दास गंगाधराला ॥ दिधले स्फूर्तिला ॥
करण्या कवनाला ॥ प्रेम भावें ॥ ३ ॥

( १८ )

( चाल— भैरवी, या विरहा कां० )

मज आस तुझ्या चरणाची ॥ साइ ॥ वाढी भिक्षा प्रेमाची ॥
साइ ॥ मज आस ॥ धृ० ॥
तव चरणांबुज, मज, हृदयसरोजीं ॥ रोंपुनी वाढवी,
चिरगती रोजी ॥ उणीव कृपाजलाची ॥ साइ ॥ १ ॥
नम्र साइ पदीं नित गंगाधर ॥ सेवा करण्या निशि-
दिनीं तत्पर ॥ जोड दे तुझ्या चरणांची ॥ साइ ॥ २ ॥

( १९ ते २४ )

( श्लोक )

श्री साइनाथ प्रभुला नमनें करोनी

साई सदा पुजित जा समने करोनी

ईश स्तुती विण दुजें न मनांत आणी ॥

नारायणा विण सखा दुसरा न कोणी ॥ १ ॥

थरथरे कांपे काळ श्री साइनाथा ॥

मग इतराचा कोण केवा समर्था

हा श्री आहे पूर्ण ठेवा अनाथा ॥

रात्री प्रेमें वंदुनी साइनाथा ॥२॥

जरी हरी भेटीची आस आहे तुम्हासी ॥

कीजे प्रभुसेवा पूजनी सद्गुरूसी ॥

जयजयकारें आठवा श्रीहरीसी ॥

यमरायाचे पाश ते तोडण्यासी ॥ ३ ॥

गंधर्व किन्नर सुरासुर लोकपाल ॥

गाती यशा प्रभुचिया पुजुनी त्रिकाळ ॥

धरिती शिरीं वंदिति साईनाथा ॥

रथीं मिरविती अर्चिती साइ नाथा ॥ ४ ॥

विश्वा व्यापुनि अंगुळें दश प्रभू उरला असे शेष हा ॥

षट्पादा गिळुनी निशीं मिटुनियां निजशक्ति दावी पहा ॥

नूतन कलिरूप पाहण्या नलिनीचा सेवावया गंध हा ॥

क्षीराब्धीं अथवा तडाकजालिं त्यां अन्योन्य प्रेमा पहा ॥५॥

रक्षीतसे अनुदिनीं निज सेवकाला ॥

साई दयार्द्र उदधी दिन बालकाला ॥

गवां हरूनि निशिच्या तरणी उदेला ॥

रक्षूनि हार करि साइ भव सागराला ॥ ६ ॥

॥ श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबार्पणमस्तु ॥

# रावबहादुर एच. व्ही. साठे

दक्षिणा-भिक्षा संस्थेचा स्थापना करणारे व तिचे चालक रावबहादुर एच. व्ही. साठे, श्रीसाईबाबांचे एक जुने भक्त यांनीं त्या संस्थानें चालविलेल्या 'श्रीसाईनाथ प्रभा' या मासिकांत श्रीसाईबाबांचे बोल गोष्टीरूपानें प्रसिद्ध झाले होते, ते एकत्र करून 'श्रीसाईनाथ कथाकरण्डक' पुस्तक छापलें, त्या कथा श्रीसाईलीला मासिकांत प्रसिद्ध करण्याबद्दल परवानगी दिली आहे. त्याबद्दल आम्हीं त्यांचे फार आभारी आहोंत. त्यांतील भाषा जी लिहिली आहे, ती बहुतेक श्रीसाईबाबा जसें बोलत असत, त्याप्रमाणें ती भाषा आहे. त्यावरून ज्यांना श्रीसाईबाबांचें बोलणें ऐकण्याचा लाभ मिळाला नाहीं, त्यांना श्रीसाईबाबा कसे बोलत होते त्याची थोडीशी कल्पना येईल.

## श्रीसाईनाथ कथाकरण्डक यावरून

( ले. **समर्थांचा चोपदार** )

### कथा १ ली

[ प्रातःकाळीं शौचमुखमार्जनविधि उरकून नित्याप्रमाणे एक-दोन घरें भिक्षा मागून आल्यावर श्रीसमर्थ साईनाथमहाराज न्याहरी करतात. ती झाल्यावर स्वारी मशिदीच्या मध्यभागीं बसते. भोंवती कांहीं शेलकी भक्तमंडळी सेवा करीत असते. आणि मग श्रीसमर्थ अत्यंत उद्बोधपर पण बऱ्याच अंशीं विसंगत अशा कथा सांगण्यास सुरुवात करितात. त्यांपैकीं कांहीं कथा ऐकण्याची लेखकाला जी संधि मिळाली व ऐकलेल्या कथांतून ज्या थोड्या त्याच्या लक्षांत राहिल्या, ज्या त्याला व्यवस्थित जुळवतां आल्या, त्या बोधप्रद व तशाच मनोरंजक वाटल्यावरून त्यांचा संग्रह ह्या कथाकरंडकांत केला आहे. संग्रह वाचकांना कल्याणप्रद होवो, अशी श्रीसमर्थांच्या चरणापाशीं लेखकाची अत्यंत नम्र विज्ञापना आहे. ]

**समर्थ म्हणाले**:-"मी पैठणास एका बामणाकडे होतों, तो बामण लई चांगला होता. माझ्यावर त्याची लई कृपा होती; मीबी त्याचे संमदी काम करीत असे. आणि दोपारा कोरभर भाकर खाऊन त्याच्याजवळ स्वस्थ पडत असें. असे बामण बी आतां नाहींत. आणि दुसरे लोकबी कोणी नाहींत. सर्व मतलबी झाले."

हें ऐकून एका भक्तानें विचारलें "आतां तो बामण आहे का ?"

बाबा म्हणाले, ह्या "गोष्टीला दोनशें वर्षें झालीं, अजून का तो पैठणास राहिला आहे ? असेल कोठें तरी, अल्लामियाला महीत !"

भक्तः-मग तुम्ही दोनशें वर्षांची गोष्ट सांगतां तर तो बामण हल्ली कोठें आहे, त्याचें नांव काय, वगैरे तुम्ही कां सांगत नाहीं ?

बाबा:-अल्लामियाची करणी; आपल्याला काय करायचें आहे

**भक्त:**—पण त्या वेळेस तुम्ही होतां ना? तुम्हांला सगळे माहित असून स्मरते ना सगळें अजून?

**बाबा:**—अरे, त्याच्याही पूर्वी मी हजार वर्षांपासून आहें हें तुला कुठं ठाऊक आहे? मी प्रयागास होतों तेव्हां तर लई मजा! लई गंमतच झाली! तुला कुठं माहित आहे?

**भक्त:**—बाबा, आपण सांगितल्याशिवाय आमच्यासारख्यांना कसें समजणार? आपण कृपा करून सांगावें.

**बाबा:**—मी प्रयागास एका झाडाखालीं चिलीम पीत बसलों होतों. तों एक बामण हातांत भला मोठा वीणा घेऊन भजन करीत मी बसलों होतों तिथं आला. आणि मला नमस्कार करून म्हणाला, "बाबा! नजिकच एक मुकुंद नांवाचा ब्राह्मण तप करीत बसला आहे, त्याला जाऊन सांगा कीं, तुझ्या तपाची फलप्राप्ति लौकरच होणार आहे,-यास्तव तपाचें उद्यापन करून टाक, आणि स्वस्थ एकाग्र चित्तानें राहा."

**बाबा**—म्या म्हटलें, "ही कटकट कोण करीत बसतो? आपल्याला नको बाबा. तूंच जाऊन सांगेनास रे?" पण तो तंबुरेवाला बामण ऐकेना! आणि मलाच आग्रह करून म्हणाला, "महाराज! हें काम आपल्यालाच केलें पाहिजे. आपला सांप्रतचा वेष व आपलें या ठिकाणीं येणेंही ह्याकरितांच आहे; हें मीं सर्व ताडलें आहे. परंतु निमित्ताला कारण म्हणून मला आज्ञा करितां आहां, इतकेंच. बाकी आपला या वेषांत इकडे येण्याचा हेतु मला कळलाच आहे." यावर

**मी म्हटलें:**—"ती रांड मला अशीच सतवते! अल्लामियाची मर्जी." मग त्या तंबुरेवाल्यास मीं म्हटलें, बरें तुम्ही जा, आतां. मी सर्व ठीकठाक करतों. "हें ऐकून तो तंबुरेवाला मला नमस्कार करून भजन करीत चालता झाला. लई गोड भजन बर का! आणि बामण बी मोठा निष्ठावान बर का!"

**भक्त**—मग पुढे?

**बाबा**—मग पुढें मी त्या तंबुरेवाल्याच्या सांगण्याप्रमाणें त्या मुकुंदाच्या मठींत गेलों. ती मठी येथून निंबगांवाइतकीच लांब होती (साई अबादापासून निंबगांव उत्तरेस एक मैल आहे.) तेथें जाऊन मठांत शिरलों. तोंच मुकुंदबुवा चटकन उठून मला म्हणालें, "हं खबरदार! आंत येऊं नका. मी अनुष्ठानांत आहें, तुम्ही येत आहांत तर बाहेर चालते व्हा." म्यां म्हटलें, "ही काय रे कटकट? तो तंबुरा बामण मला एक सांगतो आणि हा बामण मला दुसरेंच बोलतो! मग म्यां करावें तरी कसं? अल्ला मालिक आहे. आल्लाला सर्व मालूम आहे." मी इतकें म्हणतों, तोंच मुकुंद ताबडतोब उठला आणि माझ्याकडे येऊन माझे पाय धरून मला नमस्कार करून मनांतल्या मनांत कांहींसं पुटपुटूं लागला. त्याच्या मनांत काय होतं, तें मला अल्लाच्या कृपेनं तत्काळंच कळलं, आणि मग मींही त्याला काय सांगायचं होतं तें (अल्ला का हुकूम) त्याला मनानंच कळवलं आणि तेथून निसटलों. तों एका घटकेच्या आंतच मुकुंद

एक शिष्य धांवत धांवत येऊन म्हणाला, " साईमहाराज ! आपण आमच्या मुकुंद-महाराजांना काय सांगितलंत ? त्यांनीं तर आपण गेल्याबरोबर धुनी पेटवून त्यांत उडी टाकिली, आणि भस्म झाले ! आतां आम्ही काय करावं ? "

" म्यां बी म्हटलं, बरं झालं. अल्ला बरंच करील ! "

हें ऐकून तो शिष्य वेड्यासारखा बरळूं लागला आणि मला म्हणालाः—"आतां आम्ही सर्व शिष्यमंडळी अग्नींत उड्या टाकूं. त्याचं सर्व पाप तुमच्या डोक्यावर लादणार. खूप समजून राहा बरं का ! "

मीं म्हटलं, " बरं बाबा; अल्ला मालिक आहे. "

हें ऐकून तो शिष्य परत गेला. आणि मीहि पुढे सटकलों आणि थेट उमरकोटच्या रस्त्याला लागलों. एकदोन दिवस चालतांचालतां एक वाळूचं मैदान लागलं. तिथं पाहिलें तों एक मोठा उमदा गृहस्थ बसला होता; त्याच्या शेजारीं एक स्त्री "पाणी पाणी " करीत पडली होती ! एकदोन नोकरचाकर होते, ते स्वस्थ उभे होते. तो उमदा गृहस्थ उद्गारलाः—"पाणी आहे का ? एक चुळकाभर असलं तरी बस्स आहे. आमच्या ह्या राणीसरकार तान्हेनें फार व्याकूळ झाल्या आहेत; आणि तशांत ह्या गरोदर असल्यानें त्यांच्यानं एक पाऊलही पुढें टाकवत नाहींसं झालं आहे. "

इतकें तो म्हणतो आहे तोंच माझ्या टंबरेलांत पाणी होतं तें मीं त्या बाईच्या तोंडांत घातलं; बाई ताबडतोब सावध होऊन उठून बसली आणि मला पाहतांक्षणीं माझ्या पायावर तिनें आपलं डोकं ठेवलं. मीं तिच्या डोक्यावर हात ठेवला आणि त्या सर्वांना उमरकोटास जाण्याची आज्ञा केली. त्या बाईचा नवरा हा सर्व प्रकार पाहून, माझ्यापुढे गुढघे टेकून, आकाशाकडे हात करून म्हणालाः—" बाबा ! आतां आमची पुढें काय गत ? आम्ही काय करावं ? कुठं जावं ? आम्हाला आतां कोणाचा आश्रय ?"

तो इतकें म्हणतो तों टपाटप त्याच्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागले. नंतर मी त्याच्याही डोक्यावर हात ठेवून म्हणालों:—" रडूं नको. तुझं अल्ला बरं करील; तुम्ही सर्वजण आतां उमरकोटास जा. तिथं तुम्हाला चांगला आश्रय मिळेल आणिही बाई तिथं गेल्यावर प्रसूत होऊन हिला मुलगा होईल. तो लोकोत्तर बादशहा होईल. मीही तुमच्या मागोमाग येतोंच. तुम्हांस वाटेंत कांहीं अडचण पडणार नाहीं, चला उठा. "

असं त्यांस सांगून मी तिथुन निघालों तों घुमतघुमत कांहीं दिवसांनीं उमरकोटास पोंचलों. तिथं गेल्यावर ह्या मंडळींचा तपास करतां मला असं कळलं कीं, ती बाई तिथंच प्रसूत होऊन तिला मुलगा झाला आहे. मग मी त्या मुलाला पाहण्यास गेलों. त्याच्या आईबापांस भेटून सर्वांना आशीर्वाद देऊन निघून गेलों. ह्या मुलाचं नांव जलालुद्दीन महंमद. हाच पुढें अकबर ह्या नांवानं हिंदुस्थानचा बादशहा झाला. अशी मिंयांची करणी आहे. "

# शिर्डी वृत्त

## मार्च सन १९३६ ते डिसेंबर १९३६

ता. ८।३।३६ सोमवार रोजीं श्रीचे काकड आरतीच्या वेळीं श्रीच्या समाधीवरील शाल आपोआप सरकली होती; यावरून श्रीस उन्हाळा लागल्यामुळें आतांपासून शाल पांघरूं नये अशी खूण श्रीनीं दाखविली हा चमत्कार पाहण्यास श्री. माधवराव ब. देशपांडे ऊर्फ श्रीचे शामा, वगैरे बरीच मंडळी आली होती.

ता. ३०।३।३६ चैत्र शुद्ध अष्टमी रोजीं तिसऱ्या प्रहरीं ४ वाजतां गारांचा भयंकर भडिमार होऊन मोठा पाऊस पडला. त्या वेळी दासगणू महाराज यांचे कीर्तन श्रीसमाधिमंदिरांत चाललें होतें. श्री लेंडीबागेचें फार नुकसान झालें. दीक्षितवाड्यावरील कौलें उडालीं, आजूबाजूकडील झाडें उपटून पडलीं. एवढा भयंकर झंझावती वारा होता, तरी श्रीच्या सभामंडपाचे लोखंडी खांब व बीम्स जे पूर्वी कांहीं जणांकडून, शिर्डी येथील नेहमीच्या पावसाळी वाऱ्यानें हालतील व पडतील असें निमित्त सांगून, श्रीचे सभामंडपाचें केलेले लोखंडी काम पाडून टाकण्याबद्दल प्रयत्न चालले होते, ते खांब व बीम्स बिलकुल न हालतां जशाचे तसे उभे राहिले. जेव्हां ते खांब व बीम्स वरील कारणास्तव काढून टाकण्याचा प्रयत्न चालला होता, तेव्हां ऑ. चिटणीस यांनीं त्याबद्दल संस्थानचे ऑ. आर्किटेक्टस व इंजीनिअर्स मेसर्स जमनादास व भिडे या फर्मचे मोठमोठालीं घरें बांधण्याचीं कामें केलेले अनुभविक श्री. टी. आर. भिडे आर्किटेक्ट, ज्यांनीं सभामंडपाच्या जागेचें माप घेऊन मजल्याचा सभामंटपाचा प्लान तयार केला आहे व जे लोखंडी खांब व बीम्स घातल्यानंतर व पायाचें काम व स्वयंपाकघराचें काम कांहींसें तयार झाल्यानंतर तीं कामें तपासलीं होतीं, यांचा "कांहींजण म्हणतात कीं वाऱ्यानें लोखंडी खांब व बीम्स पडतील, व त्याचप्रमाणें कांहीं जण म्हणतात कीं, या मोठ्या जाडीचे खांब व बीम्स वापरावयाची जरुरी नव्हती." याबद्दलचें मत विचारलें असतां त्यांनीं त्यांचें मत सांगितलें कीं, लोखंडी खांब व बीम्स काढून टाकण्याचें बिलकुल कारण नाहीं. ते वाऱ्यानें पडणार नाहींत. कारण त्यांची जाडी इंजीनिअरिंगच्या हिशेबानें ठराविक नियमाप्रमाणें शिल्प शास्त्राच्या सभामंडपाच्या लांबीरुंदीच्या मापाला हवेतील वाऱ्याचा दाब वगैरेप्रमाणें लक्षांत घेऊन जेवढ्या जाडीचे खांब व बीम्स एका मजल्याच्या सभामंडपास ठेवावयाला पाहिजेत, त्याप्रमाणें त्यांची जाडी व मोठा आकार ठेवलेला आहे. हें केलेलें काम बरोबर इंजीनिअरिंगच्या ठराविक नियमाला अनुसरून केलेले असून नवलें नसून मजबूत आहे व तें बिलकुल पडणार नाहीं. श्रीनें गारांच्या भडीमारानें व जोराचा वारा व पाऊस यानें तें काम मजबूत आहे असें श्री. भिडे आर्किटेक्ट यांच्या योग्य मताची व त्यांच्या कामाच्या अनुभवाची सर्वांना खात्री पटवून दिली. ही एक श्रीसाईलीलाच होय !

श्रीरामनवमीचा उत्सव दासगणू महाराज यांनीं नेहमीप्रमाणें उत्तम रीतीनें साजरा केला. यंदा श्री रामनमीस यात्रेस गारांच्या पावसामुळें दुकानें फार आलीं नव्हतीं, तरी पाहुणे मंडळी नेहमीपेक्षां जास्त आली होती. त्यामुळे बरीच भक्तमंबळींची राहण्याच्या बाबतींत गैरसोय झाली होती. नेहमीप्रमाणें उत्सवाम दासगणू महाराज यांचीं चार दिवस कीर्तनें झालीं.

श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव दरसालाप्रमाणें यंदाही श्रीमंत केशवराव बुटी यांच्या देखरेखीखालीं चांगला ता. ४।७।३६ रोजीं साजरा करण्यात आला. पाहुणें मंडळी बरीच आली होती. दर वर्षाप्रमाणें श्री साईदास मंडळ पुणें याचे चालक श्री. दत्तात्रय दामोदर रासनें बरोबर चाळीस मंडळी घेऊन पुण्याहून आले होते. त्यांच्याबरोबर संगीत भजन रत्न श्री. बाळकृष्ण गो. पंडित नेहमीप्रमाणें येऊन उत्सवात संगीत भजनी पदांची हजेरी देत होते. पुण्याचे रहिवासी श्री. देशमुख यांच्या लहान' मुलांचा संगीत ऑर्वेस्ट्राचा कार्यक्रम फारच मनोहर आल्हादकारक झाला. म्हैसुर दरबारचे प्रसिद्ध सनईवादनपटू श्री. बाबूराव म्हसकबो देवळानकर यांचा सनईवादनचा कार्यक्रम झाला.

सालाबादप्रमाणें श्री. गोकुळअष्टमीचा उत्सव ता. ९।८।३६ रोजीं साजरा करण्यांत आला.

यंदा श्री पुण्यतिर्थाच्या उत्सवास पाहुणेमंडळी फारच कमी आली होती.उत्सवाची व्यवस्था श्री. बा: बि. देव यांजकडे कमिटीनें त्यांच्या अटी कबूल करून सोंपविली होती. जरी उत्सवात गर्दी इतर उत्सवाप्रमाणें बिलकुल नव्हती, तरी जेवण वाढण्याच्या बाबतींत गैरव्यवस्था होती व पुण्यतिथीच्या दिवशीं श्री. बाळासाहेब देव यांनीं रचलेलें श्रीचें आख्यानाचें सुमारें तीन तास कीर्तन केलें. उत्सवात नेहमीप्रमाणें सोनेवाडीचे श्री. क्षीरसागर व पुण्याचे श्री. द. दा. रासनें यांची गायनाची हजेरी श्रीपुढें रोज होत असे. काल्याचें कीर्तन संस्थानचे गवई विठ्ठलराव यांनीं केलें. यंदा श्री. देवांच्या अटीमुळें भक्तांस उत्सवाचा प्रसाद पेढे बद्दल सुंठवडा पाठविण्यांत आला.

## पेट्यांचें उत्पन्न

| | | श्री. समाधिमंदिरामधील | श्री. द्वारकामाईमधील | | |
|---|---|---|---|---|---|
| चैत्र शके १८५८ | रु. | ४४– ३–६ | २– ९–९ | एकंदर | रु. ४६–१३–३ |
| | ,, | १०– ०–६ | १– ५–९ | ,, | ,, १२– २–३ |
| वैशाख | ,, | ३२–१५–६ | ३– ५–३ | ,, | ,, ३६– ४–९ |
| ज्येष्ठ | ,, | ५०– ८–६ | ९–१५–९ | ,, | ,, ६०– ८–३ |
| आषाढ | ,, | ५४– ६–९ | ६– ४–९ | ,, | ,, ६०–११–६ |
| जुलै ता. ३-१९३६ | ,, | १८– ०–३ | १– ०–३ | ,, | ,, १९– ०–६ |
| ,, ,, ७ | ,, | ४९– ५–९ | ६– २–६ | ,, | ,, ५५– ८–३ |
| ऑगस्ट | ,, | ५०– ७–९ | ४– १–० | ,, | ,, ५४– ८–९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सप्टेंबर | ,, | ३९-१३-९ | १-१०-९ | ,, | ,, | ४१- ८-६ |
| आक्टोबर ता. २५ | ,, | ३८- ०-० | २-१२-० | ,, | ,, | ४०-१२-० |
| ,, ,, ३० | ,, | १४- ६-३ | ३- ४-६ | ,, | ,, | १७-१०-९ |
| नव्हेंबर | ,, | ४२-१०-३ | ३- ६-६ | ,, | ,, | ४६- ०-९ |

श्री. जी. व्ही. क्षीरसागर हेड सिग्नलर सोनेवाडी यांनीं त्यांचा दर गुरुवारीं रात्रीं श्रीचेपुढें भजन करण्याचा क्रम अजूनपर्यंत ठेवला आहे.

## सभामंडप ✓

सभामंडपाचें काम संस्थानकमिटीनें, श्री. दामोदर सा. रासने नगरचे मोठे व्यापारी व एक श्रीसाईबाबा यांचे निस्सीम जुने भक्त यांच्या विनंतीस मान देऊन एक मजल्याचा शोभिवंत श्रीसाईबाबांच्या नांवाप्रमाणें सभामंडप बांधण्याचें 'ठरविलें व त्या वेळीं असें ठरलें कीं, जरी मजल्याचा शोभिवंत पुरा सभामंडप बांधण्यास रुपये दहा हजार ते रुपये बारा हजार खर्च येईल, (दासगणू महाराज व श्री. रासने यांनीं त्यांच्या इंजीनिअर्सना विचारून व प्लान काढून ठोकळ अंदाज केला होता.) तरी संस्थानकमिटीनें त्या कामास प्लान (नकाशे) वगैरे व अंदाज रुपये दहा हजारांचा काढून प्लान पसंत झाल्यावर कामाला सुरुवात करावी व तूर्त तें काम सभामंडपाचा पाया, स्वयंपाकघराचें काम व सभामंडपाच्या मजल्याचें लोखंडी काम एवढीं कामें रु. ३५०० पर्यंत करावींत असें ठरविलें होतें व पुढें जसजसा निधि मिळत जाईल, त्याप्रमाणें पुढें काम श्री. टी. आर. भिडे आर्किटेक्ट यांनीं तयार केलेल्या प्लानप्रमाणें करावयाचें. तें काम आतां निधीच्या अभावीं बंद ठेवण्यांत आलें आहे. हें काम सुरु झाल्यानंतर बराच गैरसमज व नालस्ती ऑ. चिटणीस सुंदरराव दी. नवलकर यांच्याबद्दल कांहीं जणांकडून मुद्दाम केली जात आहे. त्याचीं कारणें येथें सांगण्यासारखीं नाहींत. या सभामंडपाचें काम सुरु झाल्यानंतर कांहीं भानगडी उघडकीस आल्या. त्या ऑ. चिटणीस यांनीं कमिटीच्या नजरेस आणल्या, तरी त्याकडे कमिटीनें बहुमतानें दुर्लक्ष केलें. श्रीचे सभामंडपाचें काम सुरु झालें नसतें, तर कोणासही याची दाद अजूनपर्यंत लागली नसती ही श्रीसाईची लीला होय! व असेंही सांगण्यांत येतें कीं, ऑ. चिटणीस यांनीं कोणास न विचारतां आपल्याच मतानें तें काम सुरू केलें व तें काम (डोलारा) व त्यास वापरलेलें सामान फार किंमतीचें असून अवाढव्य आकाराचे लोखंडी खांब व बीम्स वापरलेले आहेत. हें काम श्री. भिडे आर्किटेक्ट यांनीं मजल्याचा सभामंडपाचा प्लान करून व लोखंडी सामानाचा आकार इंजीनिअरिंगच्या ठराविक नियमाप्रमाणें लागणाऱ्या आकाराच्या प्रमाणानें ठेवलेले आहेत. हें काम तज्ञांचें आहे. ज्यांनीं त्यांनीं उठला सुटला म्हणावें कीं मजल्याच्या सभामंडपास लोखंडी खांब व बीम्स अवजड व अवाढव्य आकाराचे आहेत व असें म्हणणें म्हणजे श्री. भिडे आर्किटेक्ट, जे मुंबईमध्यें त्यांच्या अशीलांच्या पन्नास हजारांची ते लाख रुपये किंमतीच्या

इमारती बांधतात, त्यांना त्याच्या शिल्पशास्त्राची माहिती नाहीं असें म्हणण्यासारखें आहे व कांहींजण असेही आतां लोकांचा गैरसमज करून देतात कीं, एवढ्या रु. ३५०० च्या किंमतींत पुरा सभामंडप झाला असता. गोल वांसे व पत्रे वापरले असते तर रु. २००० पर्यंतहीं कोपरगांवच्या स्टेशनवरील गुळाच्या गोदामासारखा झाला असता व रु. १००० पर्यंत मुंबईनजिक अंधेरी, गोरेगांव, मालाड, बोरिवली येथे म्हशींचे तबेले बांधले आहेत त्याप्रमाणें बांधताही आला असता. यांनीं अशा प्रकारचा सभामंडप बांधल्यानें श्रीसाईबाबा यांच्या नांवास व कीर्तीस शोभेसा झाला असता काय ? श्री. रासने यांची अट अशी होती कीं, मजल्याचा शोभिवंत सभामंडप श्री साईबाबा यांच्या नांवास शोभेल असा बांधावा. त्याप्रमाणें वर लिहिल्याप्रमाणें योजना करून कमिटीनें मजल्याच्या शोभिवंत सभामंडपाच्या कामास सुरुवात केली.

हें काम संस्थान कमिटीच्या व पोटकमिटीच्या मंजुरीनें झालें आहे किंवा नाहीं किंवा ऑ. चिटणीस यांनीं आपल्याच मनाप्रमाणें कोणास न विचारतां केलें आहे. याबद्दलचा पुरावा श्री. साईलीला मासिकचे वाचक यांस श्रीसाईलीला मासिक वर्ष ११ अंक ८, ९, १०, ११, १२ व १३; वर्ष १२ अंक १ व २ यांतील अनुक्रमें सप्टेंबर, आक्टोबर, नव्हेंबर व डिसेंबर १९३४ व जानेवारी, फेब्रुवारी, मार्च व एप्रिल १९३५ हे पाहावेत म्हणजे खात्री होईल.

दासगणू महाराजांचें असें म्हणणें होतें कीं, एकदां सभामंडपाच्या कामास सुरुवात झाली म्हणजे त्या कामाकरितां आपोआप निधि जमत जाईल म्हणून रु. ३५०० पर्यंत खर्च करण्यास कमिटीनें मंजुरी देऊन कामास सांगितल्याप्रमाणें सुरुवात केली. त्याप्रमाणें ती जमत चालली होती. परंतु कांहीं जणांनीं हट्टानें त्या कामाबद्दल वर दर्शविल्याप्रमाणें भक्तांचा गैरसमज करून दिल्यामुळें निधि जमा न झाल्यानें काम तसेंच अपुरें पडलें आहे.

सभामंडपाच्या बाजूचे स्वयंपाकघरावरील गच्ची, दक्षिणेकडील भिंत व त्या बाजूवरील गच्ची, पहिल्या मजल्यावरील गॅलरीची रीएनफोर्स कॉंक्रिटची लादी हीं कामे तूर्त जरुरीचीं श्री. भिडे आर्किटेक्ट यांनीं केलेल्या प्लानाप्रमाणें करण्यास सुमारें रु. १५०० ते रु. २००० पर्यंत लागतील. म्हणजे सध्यां श्रीरामनवमीचा उत्सवांत बसण्या-उठण्याची तरी सोय होईल.

यंदा शिर्डी येथें खरीपाचा पाऊस न पडल्यानें गुरांना चाऱ्याची फार टंचाई पडूं लागली व पिकें अजिबातच जळून गेलीं. श्रीकृपेनें रब्बीच्या हंगामाकरितां पाऊस वेळेवर पडल्यानें लोकांस थोडासा धीर आला आहे. त्यापूर्वी ते हवालदिल झाले होते.

संस्थान कमिटीच्या सभा शिर्डीसंस्थान येथें श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्री-पुण्यतिथि उत्सवांत भरण्यांत आल्या होत्या.

श्रीभक्तांकडून श्रीस जिनसा वगैरे नेहमींप्रमाणें आल्या आहेत व त्याचप्रमाणें श्रींचे भक्त दूर ठिकाणाहून श्रींच्या दर्शनास सतत येत असतात.

कै. रामचंद्र आत्माराम तर्खड माजी ऑ. खजिनदार यांचें काम ऑ. चिटणीस श्री सुंदरराव दी. नवलकर हे श्री पुण्यतिथिउत्सवापर्यंत आपले ऑ. चिटणीसाचे काम संभाळून करीत होते. त्यानंतर श्री. रामचंद्र रा. सामंत यांस ऑ. खजिनदार नेमलें आहे. कै. रामचंद्र आत्माराम तर्खड यांच्या सभासदाच्या रिकाम्या झालेल्या जागेवर पहिल्यानें श्री. रामचंद्र रा. सामंत यांस श्री. गुरुपौर्णिमेच्या सभेत सभासद निवडले.

शिर्डी-संस्थानचे भक्तमंडळाकडून संस्थान कमिटीकरितां सभासदांची निवडणूकीच्या कामास येत्या फेब्रुवारी महिन्यापासून सुरवात करावी असें जर संस्थानकमिटीनें ठरविलेलें आहे, तर आजपर्यंत ऑ. खजिनदार श्री. रामचंद्र रा. सामंत याजकडून त्यांचेकडे गेल्या ता. १ एप्रिल १९३६ पासून भक्तमंडळीचा किंवा कायम फंड रु. ५ किंवा जास्त भरले असतील; अशा भक्तांच्या नावांची यादी पाठविण्याबद्दल त्यांस वारंवार कळविलें असतां त्यांजकडून त्याबद्दलचा जबाब किंवा यादीही आली नाहीं; म्हणून काम वेळेवर सुरवात करण्यास ऑ. चिटणीस यांस सांपडणार नाहीं. त्याचप्रमाणें आढावे तयार झालें आहेत किंवा नाहींत (शके १८५६ व ५७ चें ) त्याबद्दलही जबाब नाहीं.

बहुतेक धर्मादाय व देवस्थान संस्थानच्या उत्पनाचा विनियोग त्या त्या संस्थेच्या घटणेच्या अनुसरानें केला जात नाहीं अशी ओरड बहुतेक संस्थांमध्यें ऐकूं येते, त्यांस श्रीसाईबाबा शिर्डी संस्थान ही संस्था अपवाद नाहीं. त्यांतील अनागोंदीचा कारभार व हिशेब याबद्दल ऑ. चिटणीस यांनीं संस्थानकमिटीच्या नजरेस आज दोन वर्षें एकसारखे आणीत असतां एकमेकांच्या मोहबतीखातर त्याकडे दुर्लक्ष करण्यांत आल्यानें संस्थानास आजमितीस नुकसान सोसावें लागत आहे. एवढें नुकसान प्रत्येकाच्या खिशांतून द्यावें लागले असतें, तर ते गप्प बसते ना. सार्वजनिक पैसा म्हणजे कोणाचाच पैसा नाहीं.

एखाद्या संस्थेचे सभासद किंवा विश्वस्त, नांवाचे सभासद किंवा विश्वस्त राहिले व सर्व कामें एका सभासदाच्या किंवा विश्वस्ताच्या मर्जीनुरूप करण्यास मुभा दिली किंवा एखाद्या सभासदानें किंवा विश्वस्तानें बळजबरीनें आपल्या हातांत आपल्यां वजनाच्या साह्यानें कांहीं जणांना खुश ठेवून सर्व अधिकार घेतला, तर त्या संस्थेंत हिशेबाच्या बाबतींत व इतर कामांत घोटाळे झाल्याशिवाय राहत नाहींत. एका सभासदानें आपल्या हातांत सर्व कामें कमिटीस न विचारतां पाहण्याचा स्वतःच अधिकार घेतल्यानें एखादा सभासद जसें करिल त्याला इतर कांहीं सभासद न्याय व सत्य याचा विचार न करितां मोहबतीखातर दुजोरा देतील, तर धार्मिक संस्थेंत कांहीं सभासद अशा रीतीनें वागल्यांचा परिणाम वाईटच होणार.

एक सभासद वाटेल त्याप्रमाणें इतरांना न विचारतां कारभार करितो व इतर सभासद फक्त नांवापुरते सभासद असतात. अशाबद्दलचे लेख केसरी ता. ३।९।३५,

गोग्रास ता. १५।४।३६ व प्रभु तरुण ता. १६।१२।३६ यांमध्यें आले आहेत. त्यापैकीं केसरींतील अशा सभासदांच्या अनागोंदीच्या कारभाराला पायबंदी करावी. प्रत्येक संस्थान कमिटीस हा लेख लागू पडतो.

श्री. बा. वि. देव, अण्णा चिंचणीकर ट्रस्टचे एक विश्वस्त ते व त्या ट्रस्टच्या इतरांच्या वतीनें व अण्णा चिंचणीकर कळवितात कीं त्या ट्रस्टच्या निव्वळ उत्पन्नांतून ⅓ हिस्सा रोजच्या श्री साईबाबा यांच्या पूजेअर्चेस खर्चाकरितां शिर्डी संस्थानास अण्णा चिंचणीकरांच्या वुइलप्रमाणे शके १८५६ अखेर देण्याची रक्कम रु.२४२१-८-० त्यांच्या हिशेबाप्रमाणें निघते व ह्यापैकीं रु. ९६० जागा खरेदी करिता वापरले व ह्यापैकीं बाकीचे रु. १४६१-८-० अण्णा चिंचणीकराचे ट्रस्टनीं अद्याप शिर्डी संस्थानास दिले नाहींत व अण्णा चिंचणीकर ट्रस्टचेही मागील सात वर्षांचे हिशेब दिले नाहींत म्हणून यावरील रकमा बद्दल तुर्त कांहीं म्हणतां येत नाहीं.

"पुष्कळ ठिकाणीं अशा संस्थावर देखरेख ठेवण्यासाठीं एकापेक्षां अधिक ट्रस्टी नेमलेले असतात. या अनेक ट्रस्टींपैकींच एक मॅनेजिंग ट्रस्टी म्हणून काम पाहतो व इतर नुसते नांवापुरते ट्रस्टी असतात. हे मॅनेजिंग ट्रस्टी त्यांच्या मनास येईल तसा कारभार करतात आणि इतर ट्रस्टी संस्थेची कितीही नुकसानी झाली, तरी तिकडे लक्ष देत नाहींत. कारण मॅनेजिंग ट्रस्टी जबाबदारीनें सर्व कारभार पाहत आहेत; तेव्हां त्यांच्या एकतंत्री कारभारांत ढवळाढवळ करण्याचें आपणाला कारण नाहीं अशी त्यांची समजूत असते. पुष्कळ ठिकाणीं अशा ट्रस्टींची कैक वर्षांत एकत्र गांठ पडण्याची मुष्कील, तर आपुलकीच्या भावनेनें संस्थेची विचारपूस कोण करणार?"

—केसरी, ता. ३।९।३५

"संस्था म्हटली कीं दीर्घकाल टिकाऊ दृष्टीने नियमबद्ध केलेले संघटनात्मक मंडळ अशीच कोणीही व्याख्या करील. अशी संस्था एका व्यक्तीची किंवा एकाच्याच तंत्रानें चालणारी बहुधा नसते; म्हणजे ती एखाद्या व्यक्तीनें उभी केलेली नसते. त्यानंतर कर्ती व्यक्तिही स्वतंत्र राहूं शकत नाहीं. तिला सर्वांच्या अनुमतानें वागावें लागतें. साह्यकर्त्यांनींही आम्ही द्रव्यसाह्य करितों म्हणून कार्य चालतें असा अभिमान धरूं नये."

—गोग्रास ता. १५।४।३६

ही वरील माहिती देण्याबद्दल माझी ऑ. चिटणीस या जागेची दबाबदारी ओळखून सर्व श्री. साईभक्तांस देत आहे. पुढें मागे असें कोणी म्हणूं नये कीं, ऑ. चिटणीस यांनीं सर्व गोष्टी आमच्यापासून कां लपवून ठेविल्या आहेत ? ऑ. चिटणीस यांना संस्थान सभेच्या कांहीं सभासदांच्या कारस्थान व कटामुळे संस्थाच्या घटनेमुळें काम करण्यास अशक्य होत आहे हे येथें सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

# इतर वृत्त

अण्णा चिंचणीकर ट्रस्टचे पहिल्यापासून असलेले एक विश्वस्तरावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान त्यांस न विचारतां व न कळवितां त्या ट्रस्टचे इतर विश्वस्त हे कांहीं पैशाचा व इतर व्यवहार त्या ट्रस्टच्या योजनेविरुद्ध करीत आहेत व सात वर्षांचा हिशेब त्याकरितां प्रसिद्ध केला नाहीं किंवा त्यांस कळविला नाहीं. म्हणून अशा कारभारांत त्यांचा कांहीं संबंध नाहीं व यापुढें नांवाचे विश्वस्त राहणें त्यांस योग्य न वाटल्यावरून त्या ट्रस्टच्या विश्वस्ताच्या जागेचा राजीनामा त्यांनीं त्या ट्रस्टच्या हिशेबाच्या व इतर बाबतींत त्यांचा सल्ला घेतला जात नव्हता म्हणून दिला आहे, असें कळतें.

श्रीसाईभुवन
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट
मुंबई, २ ता १२ जानेवारी १९३७

**सुंदरराव दी. नवलकर**
ऑ. चिटणीस
शिर्डी संस्थानकमिटी

---

# अनुभव

श्रीसाईलीला मासिकाचे संपादक यांस सप्रेम न. वि. वि. आपण कृपा करून माझ्या खालील अनुभवांचा मजकूर आपल्या मासिकांत प्रसिद्ध कराल असें इच्छितों. क. लो. ही. वि.

श्री. साईबाबांचे एक भक्त श्री. बी. व्ही. एन. स्वामी, बी. ए., एल्एल्. बी. व एक्स एम्. एल्. सी., मद्रास, हे श्रीसाईबाबांचें चरित्र इंग्रजीमध्यें लिहीत आहेत. त्याकरितां मजकूर श्रीसाईभक्त जेथें जेथें सांपडतात तेथें त्यांस प्रत्यक्ष भेटून त्यांजकडून प्रत्यक्ष माहिती एखाद्या वर्तमानपत्राच्या बातमीदाराप्रमाणें त्यांची स्वतःची खात्री होण्याकरितां प्रश्न विचारून गोळा करीत होते. श्रीसाईबाबा योगी पुरुष असून त्यांच्यापासून भक्तास काय बोध झाला याबद्दलची माहिती विशेष करून विचारीत होते. त्यांचें श्री. साईभक्तांस भेटण्याचें काम पुरें होऊन आतां ते मद्रास येथें त्यांच्या घरीं जाऊन त्यांनीं गोळा केलेल्या माहितींतून श्रीसाईचरित्र इंग्रजीमध्यें लिहिण्यास आरंभ केला आहे. त्यानीं ज्या भक्तांना श्रीचें दर्शन व सहवास घडला होता त्यांचे अनुभव व त्याचप्रमाणें ज्यांस श्रीच्या दर्शनाचा व सहवासाचा लाभ झाला नाहीं त्यांचीही त्यांनीं भेट घेतली. ठाणें येथील श्री. बा. वि. देव, श्री. श्री. ना. खैरकर, श्री. जी. बी. दातार, वकील, वांद्रें येथील रावसाहेब गाळवणकर, श्री. पुरंदरे, वगैरे मंडळी सांताक्रुझ् येथें रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान, पुणें येथील रावबहादुर अवस्ती, रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज्ज, प्रो. बा. के. नरके, सौ. ताराबाई तर्खड, श्री. गो. का. गाडगीळ, मुंबई, येथें श्री.

रणछोडदास, नारायणदास सॉलिसिटर, कांहीं पार्शी मंडळी, शिर्डी येथील श्री. माधवराव देशपांडे, श्री. तात्या गणपत पाटील कोते वगैरे मंडळीच्या भेटी घेतल्या.

ते मद्रास येथें गेल्यावर त्यांनीं मजला पत्र पाठविलें कीं, तुम्हीं जी माहिती व अनुभव श्रीसाईबाबा यांच्या सहवासांत त्यांनीं त्यांचें रोज लेंडीहून परत आल्यानंतर दरबार भरवीत असत, त्या दरबारांत सांगितली त्याच्या पुष्टीकरणार्थ श्रीसाईबाबांचे त्या बोलाप्रमाणें उल्लेख श्रीसाईसच्चरितांत मध्यें कोठें आले असल्यास कळवावें. मीं श्री. साईसच्चरित वाचलें होतें तरी त्यांत तेच बाबांचे ऐकलेले बोलासारखे बोल आहेत असें माझ्या नजरेस आलें नव्हतें. दुसरे ऐकलेले बोलासारखे बोल मात्र माझ्या नजरेस आलेले होतें. म्हणून श्रीयुत स्वामींना उत्तर पाठवावें कीं, श्रीसाईसच्चरितांत. ते बोल नजरेस आलेले नाहींत. दुसरे आलेले आहेत. गुरुवार ता. ३१।१२।३६ रोजीं रात्रीं श्रीसाईसच्चरिताचा एक अध्याय वाचण्यास सुरू केला. त्यांत ते श्रीसाईचे बोलासारखे बोल वाचले. नंतर दुसरा एक अध्याय वाचण्यास सुरू केला त्यांतही श्रीसाईबाबा यांच्या शिकवणुकीच्या बोलाबद्दलच्या ओव्या सांपडल्या. यावरून श्रीसाईबाबांच्या " **श्रद्धा** " व " **सबुरी** " या बोलाची आठवण होते. ते तुमच्याजवळच आहेत, तेव्हां तुम्हीं सरळपणानें, नीतीनें, खरेपणानें कारस्थान न करण्यानें वागाल तेव्हांच; नाहीं तर पशु आणि मनुष्यप्राणी यांमध्यें जो सृष्टिदृष्ट्या फरक आहे, तोच फरक दिमाखी अवडंबर व स्वतःचें स्तोम माजविणारे, व सत्याबद्दलची चाड नाहीं अशा नांवाचे श्रीसाईभक्त व प्रामाणिक श्रीसाईभक्त यांमध्यें आहे. आपण मनुष्यप्राणी स्वतःचीं मतलबी कारस्थानें करण्यांत गुंतून गेल्यामुळें व दांभिक भक्ति केल्यानें श्रीच्या पायांच्या दर्शनाच्या लाभास मुकतों व सद्गुरु करण्याचा जो हेतु—आपल्या मनास चिन्मय आनंद व अखिल-शांति मिळावी व भगवंतदर्शन घडावें, हा केव्हांही साध्य होत नाहीं व आपल्या देहाची उन्नतिही होत नाहीं.

आणि सप्रेम जंव भक्ती घडे ना। कळी उघडे ना मनाची ॥

श्रीसाई सच्चरित अ. ११

श्रवण केलें भाराभर। पर अविद्येचे थरावर थर ॥<br>
तें काय श्रवणाचे प्रत्यंतर। व्यर्थ भाराभर श्रवण तें ॥ ४३ ॥<br>
न घडे जेणेनि मळ क्षाळन। त्यासे काय म्हणावें साबण ॥<br>
करी न जें अविद्यानिरसन। तें काय श्रवण म्हणावें ॥ ४४ ॥

**श्री साईसच्चरित अध्याय. १५**

आपला,

**एक श्री साईशागिर्द**

# सभामंडपनिधि

**चुकीची दुरुस्तीः** मागील शके १८५७ चा जोड अंक १०, ११, व १२ यांतील सभामंडपनिधि सदराखालीं पान ६५ वर ता. १९।११।३५ अखेर आलेली वर्गणी एकंदर रु. १८९५–७–३ बद्दल रु. १८५५–११–३ वाचावें.

शके १८५७ सन १९३५ (रु. ७८१–१–३) बद्दल (७८१–५–०) वाचावें.

श्री. शंकर गंगाराम गायधनी, नाशिक रु. १ बद्दल रु. २ वाचावें

श्री समर्थ वाच कं. मुंबई रु. ४–८–० बद्दल रु. ०–८–० वाचावे.

श्री. नागेश आत्माराम सावंत, मुंबई, २१ बद्दल रु. ५१ वाचावे.

श्री. सुंदरराव. दी. नवलकर ऑ. चिटणीस यांजकडे ता. १२।११।३५ ते ता ३१।१२।३६ पर्यंत सभामंडपाची आलेली वर्गणी खालीलप्रमाणें एकंदर रु.४१-१०-०

श्री. शिवधुलारी जगन्नाथ खार. रु. १–४–०; श्री. साईभक्त, (C/o श्री. वर्तक, मुंबई ) रु. ५–०–०; श्री. विश्वनाथ कृष्णाजी भोसले, धुळें, रु. ४–०–० ; श्री. सदाशिव वि. पाठक, पारनेर, रु. १–०–० ; श्री. शंकर गं. गायधनी, नाशिक, रु. २–०–०; श्री. पुरुषोत्तम शे. शुक्रे, वांबोरी, रु. २–०–०; श्री. गोविंद म. वडणेकर, देवास, रु. २–०–०; मेसर्स गोपाळकारा आणि सन्स. ठाणे, रु. ५–०–०; श्री. भगवंत त्रि. अढीया, डहाणू, रु. ५–४–०; त्रिभुवन नरोत्तम अढीया, डहाणू, रु. ४–०–०; श्री. पांडुरंग ज. मंत्री, मुंबई, रु. १–०–०; श्री. एस. एस. राव, मुंबई, रु. १–०–०; श्री. त्रिभुवन न. अढीया, डहाणू, रु. ५–४–०; श्री. मुकुंद ज. दांडेकर, मुंबई, रु. १–०–०; श्री. काजी बाबामिया अबदुल रहिमान वांद्रें रु. १–४–०.

# श्रीसाईसच्चरित अध्यात्मिक निरीक्षण

( ले. **सुमनसुंदर** )

## प्रास्ताविक

प्रस्तावनेच्या मिषानें मी माझें मनोगत वाचकांना खालीलप्रमाणें निवेदन करीत आहे:

( १ ) **प्रयोजनः**—कोणी न माझ्या बोलाशीं लक्ष दे।

एकही सुधें ऐकेना ॥ ( अ० ३२, ओ० १६१ )

श्री साईसच्चरित वाचीत असतां वरील श्रीबाबांची उक्ति वाचून जिज्ञासा उत्पन्न झाली व श्रीगुरुकृपें तेच बोल अनुलक्षून 'सच्चरितां'तील श्रीबाबांच्या कथावार्तांचें मनन करतां जो 'अर्थबोध' झाला, तोच प्रस्तुत 'निरीक्षण'रूपानें वाचकांना सादर करीत आहें.

( २ ) **अर्थबोधः**—'ज्ञान-कर्म-युक्त भक्तियोग' हा श्रीबाबांचा अभिप्रेत मार्ग व 'निर्गुण ब्रह्माचें सगुण प्रात्यक्षिक' हें श्रीबाबांचें अवतारवैशिष्ट्य हाच मला 'सच्चरिता'-पासून बोध झाला व त्यालाच मीं प्रस्तुत 'निरीक्षणां'त प्राधान्य दिलें आहे.

( ३ ) **तुलनाः**—श्रीहेमाडपंतांनीं बाबांच्या लीलांचें 'भक्तिपर' मंडन केलें आहे: माझा प्रयत्न तें 'ज्ञानपर' करण्याचा आहे. भक्तिमार्गांत दृष्टि भावनाप्रधान असते:,तर ज्ञानमार्गांत ती तत्त्वप्रधान असावी लागते. भक्तिमार्गांत 'चमत्कार' व 'लीला' यांना प्राधान्य देणें अपरिहार्य असतें: तर ज्ञानमार्गांत त्यांना गौणत्व देणें प्राप्त होतें: तेव्हां 'चमत्कार' व 'संतलीला' यांच्या ज्ञानपर मंडनार्थ मीं खालील आधार घेतले आहेत.

( ४ ) **चमत्कारः**—" कुंडलिनी होतां अस्थिर। करील अतर्क्य प्रकार। त्यास जन म्हणती चमत्कार। परि ते चमत्कार नव्हती ॥ तो योगींद्र घेईल दुजाचा आजार। विभूतीनें करील दुखः दूर। पाहील सर्वांचें अंतर। परी तो चमत्कार नव्हे ॥ तो पृथ्वीमाजी संचार। होईल अंतरींचा सूत्रधार। पाळील भक्तांचा भार। तो चमत्कार नव्हे ॥ विजेची ज्योत शहरांत। पाहील एक खेडवळ अंचित। तेलवत्तीवीण दिसतां प्रदीप्त। म्हणे त्या चमत्कार ॥ तैसा अनभ्यस्ता वाटेल चमत्कार। परि तो योग्याचा विहार। तूं मोहूं नको चमत्कार। म्हणोनियां ॥

( श्रीमाधवनाथदीपप्रकाशकिरण२१: ओव्या ११७—२१ )

( ५ ) **संतलीला**:–" ईश्वर करी साहस। धर्मव्यतिक्रम खास। तेजी यस्त्वामुळें नाहीं दोष। अग्नि निर्दोष ज्यापरी॥ ऐश्वर सामर्थ्य नसोन। मूढ एवढा घेई गुण। तो नष्ट होई न लागतां क्षण। कर्म दारुण गती दे॥ धर्मातीत वागेहर । तो गुण घेती पामर। काळकूट जिरवी शंकर। मरे पामर त्या शिवतां॥ ईश आणि गुणातीत। धर्माधर्म विवर्जित। श्रुति-मस्तकीं राहतात। ते वायुवत् निर्दोषी॥ त्यांचीं आचरणें प्रायः न घ्यावीं। वचनें मात्र न टाळावीं। दोन्हींशी योग्य तीं पाळावीं। सांभाळावीं धर्माहि॥ त्यांचीं सुचरितें घ्यावीं। अशी बोले श्रुति बरवी। त्यांचे भरीस न ये रवि। नर वीर्यहीन कायसा। काय सारखा दिसला तरी॥ ज्ञानी अज्ञानी यांची न हो सरी। हें जाणिजे सुज्ञ चतुरीं। कुतर्क करी तो मूर्ख॥"

( श्रीदत्तमहात्म्य अ० ३: ओ. १०१–७ )

( ६ ) **श्रीगुरुचरित्र कीं गीता**? श्रीगुरुचरित्र केवळ भक्तिप्रधान आहे. त्यांत 'भोळ्या भावा'वीण कशालाच वाव नाहीं. ती टीकातीत आहे. श्रीबाबांच्या कथावार्ता तशाच आहेत; पण त्यांत एक विशेष आहे. श्री बाबांना 'भोळाभाव–' भक्तिमार्गच प्रिय असला, तरी प्रत्येक भक्तानें 'कर्म'युक्त असून 'ज्ञानी'ही व्हावयास पाहिजे. ह्यावर श्री बाबांचा कटाक्ष आहे. म्हणजे श्री. बाबांची शिकवण तत्त्वतः श्रीमद्भगवद्गीतेंतील तत्त्वाशीं समरस आहे. तेव्हां श्रीगुरुचरित्रांतील 'लीला' व श्रीगीतेंतील 'तत्त्वज्ञान' यांचें प्रात्यक्षिक म्हणजेच श्रीबाबांच्या कथावर्ता-अर्थात् श्रीसाईसच्चरित असा हा सिद्धांत बसतो. म्हणजे भोळ्या भक्तांना 'सच्चरित' हा ग्रंथ 'श्रीगुरु-'चरित्रा'ची फलश्रुती देईल, तर 'चिकित्सकां'ना तो 'गीतेचें' ज्ञानभांडार उलगडवून दाखवील. भक्तिदृष्ट्या श्रीहेमाडपंतांनीं त्याचें यथोचित परिशीलन केलेंच आहे: आतां मीं त्याचें चिकित्सक ज्ञान दृष्ट्या परिशीलन करण्याचा घाट घातला आहे.

( ७ ) **श्रीबाबांचें अवतारकार्य**:—माझ्या मतें श्रीबाबांनीं स्वतःला परमात्मा भावून निर्गुण ब्रह्माचें कोडें प्रत्यक्ष उलगडण्यासाठीं, इतर भक्तांना प्रत्येकीं विशिष्ट अशा उदाहरणार्थ विचार, विवेक, मन, बुद्धि, अहंकार इ. अध्यात्मिक भूमिका दिलेल्या आहेत व त्यांत पदोपदीं श्रीबाबांचा 'विश्वनाटकी'पणा दृग्गोचर होतो. विविध लीला श्रीबाबांनीं अशा कांहीं घडवून आणल्या आहेत कीं, भक्तिदृष्ट्या त्या 'चमत्कार' वाटतील, तर 'ज्ञानदृष्ट्या' त्यांतील प्रत्येकांत 'अध्यात्म' व श्रीबाबांचें विश्वव्यापकत्त्व ओतप्रोत दिसेल व तेंच यथामति विशद करण्याचा प्रस्तुत निरीक्षणांत मीं प्रयत्न केला आहे.

( ८ ) **खुलासा**:—श्रीबाबा, ग्रंथकर्ता व प्रत्येक श्रीसाईभक्त यांविषयीं मला पूर्ण आदर आहे व त्या आदरयुक्त भावनेनेच 'निरीक्षण' लिहिण्यास मीं प्रवृत्त झालों.

'सच्चरितां'तील कोणाही व्यक्तीची मला वैयक्तिक माहिती नाहीं. जी काय आहे ती सच्चरितांत आलेल्या त्यांच्या वर्णनावरूनच मिळालेली आहे. श्रीबाबांचा परिवार समजून त्यांना विचार, विवेक इ. विशिष्ट भूमिका 'निरीक्षणा'साठीं देणें मला क्रमप्राप्त आहे व त्यांच्या त्या भूमिकेला अनुरूप असेंच त्यांचें वर्णन मला करावें लागणार आहे. मला कोणालाही दुखवावयाचें नाहीं: तर फक्त श्रीबाबांचें अवतारकार्यच माझ्या अल्पमतिनुसार संकलित करावयाचें आहे. प्रत्येकाची भूमिका आदरयुक्त व कोणाचीही भावना न दुखवतां अशी वर्णन करण्याची मी खबरदारी घेईनच: तरी जर कां कोणाला मीं त्यांना दिलेली भूमिका नच रुचली, व त्यामुळें त्यांच्या भावना दुखविण्याचें पातक अजाणतां माझ्या हातून घडलें, तर त्यांनीं मला उदार अंतःकरणानें क्षमा करावी असें त्यांपाशीं माझें सविनय मागणें आहे.

( ९ ) **निरीक्षण प्रेम**:—श्रीबाबांच्या लीला व स्वमुखींच्या उक्ति यांपासून जो मला बोध झाला, तेवढ्यापुरतेच मी 'निरीक्षण'क्षेत्र प्रायः मर्यादित ठेवणार आहें. केवळ अपरिहार्य व 'सच्चारित' जरूर अशा ठिकाणीं त्याचें मर्यादित अतिक्रमण होईल. प्रथमतः 'सच्चारिता'च्या अध्यायांचें क्रमशः 'निरीक्षण' करून शेवटीं जशी प्रेरणा होईल त्याप्रमाणें श्रीबाबांच्या कथावार्तांचा संकलित आढावा काढण्याचा माझा मानस आहे. येणेंप्रमाणें क्षेत्रमर्यादा आंखिली आहे. सिद्धिदाता श्रीसमर्थ आहे.

येणेंप्रमाणें मीं माझें मनोगत वाचकांना निवेदन केलें आहे. शेवटीं वाचक 'हंसक्षीरन्यायानें' हें 'निरीक्षण' सेवोत व श्रीबाबा आपल्या अज्ञ बालकाची वेडीवांकडी सेवा गोड करून घेवोत एवढी श्रीगुरुचरणीं सप्रेम प्रार्थना करून हें प्रास्तविक पुरें करतों.

॥ श्रीगुरुचरणार्पणमस्तु ॥

## श्रीदत्त बळवंत

# श्रीसाईसच्चरित अध्यात्मिक-निरीक्षण

(ले. **सुमनसुंदर**)

### माझें मंगलाचरणः

नमी एकदंत शांता अदिनाथ। सद्गुरु श्रीदत्त ' बळवंत '। जोचि श्री-शारदे-समवेत। निर्विघ्न करित कार्यसिद्धि ॥ १ ॥ येथें ' सुंदर ' केवळ निमित्त। कर्ता करविता श्रीदत्त। जोचि सगुणरूपीं ' बळवंत '। होई व्यक्त मद्द्वारा ॥ २ ॥ " दत्तासारिखें पूज्य दैवत। असतां सहज मार्गीं तिष्ठत। अभागी जो दर्शन वर्जित। मी काय पावत तयासी " ॥ ३ ॥ ही तव उक्ती साईसमर्था। प्रमाण करुनी नमिलें ' दत्ता '। पावा, या हात, व्हा जी द्रष्टा। ' निज कथावार्ता ' निरीक्षणा ॥ ४ ॥ आपुल्या ' लीला ' आपुल्यावीण। जाणण्या असती सर्व अजाण। जाणुनि भावें वंदितों चरण। पुरवा ही आण, मदिच्छा ॥ ५ ॥ नमी ' बंधु हेमाडपंत '। जोचि स्रविला ' सच्चरितामृत '। पिऊनि धालों जी आकंठ। ढेंकरवत 'निरीक्षण' ॥ ६ ॥ नमी संत, वाचक श्रोते जन। निंदक वंदक भेदविहीन। माता, पिता, आप्तगण। ' नमुनि निरीक्षण ' आरंभीं ॥ ७ ॥

**टीप**:—श्रीगणेशगीता व श्रीभगवद्गीता ह्या अर्थशः एकच आहेत. श्रीगणेशगीता माझ्या विशेष पाठांतली असल्या कारणें त्यांतील उतारे मीं ' निरीक्षणां'त घेतले आहेत. श्लोकापुढील आंकड्यांत पहिला अध्यायाचा व दुसरा श्लोकाचा निदर्शक आहे. तसेंच ' सच्चरितां'तील ज्या ओव्या घेतल्या आहेत, तेथें फक्त पुढें वरीलप्रमाणेंच आंकडे घातले आहेत. इतर ठिकाणीं ग्रंथांचा स्पष्ट नामनिर्देश केलेला आहे.

### अध्याय १ ला:

"काय असावा हा अनुबंध। गव्हां रोगाचा काय संबंध" (१-१३८)

**कथासार**:-(११०-१३६) शिर्डीत महामारीची सांथ आली.बाबांनीं पोत्यांतील गहूं काढून स्वतः दळण आरंभिलें. गांवांतल्या बाया मदतीस आपणहून आल्या. चौघीजणींनी लगट करून दळण संपविलें. बाबा स्वतः भाकरी करीत नाहींत; तेव्हां तें पीठ आपल्याला मिळेल अशी त्यांना अपेक्षा होती. त्या पिठाचे वांटे करूं लागल्या; तों बाबांनीं त्यांना 'फुकटखाऊ रांडा' इ. शिव्या देऊन तें पीठ वेशीवर नेऊन टाकण्यास सांगितलें व तें तसें टाकतां महामारी थांबली.

## 'निरीक्षण'

**१ महामारी**:- 'बध्यते कर्मबीजैः सनतो दुःखं समश्नुते !' (४-११)

महामारी म्हणजे प्रति प्राणघातक 'काळ' ! मरणासारखें दुजें भय नाहीं; जो मरण जिंकतो तोच मुक्त होतोः जन्मल्यापाठीं मरण ठेवलेलेंचः जो अज असेल तोच अमर होईलः तेव्हां जर जन्ममरणाचे फेरे—संसृतिचक्र—चुकवावयाचे असतील, तर प्रथम मुक्त झालें पाहिजे.

**२ गव्हाचें पोतें**:—"सवासनामिदं कर्म वध्नाति देहिनं बलात् ।" (२-९)

मुक्त होण्याला आपण प्रथम कां बांधले गेलों तें कळलें पाहिजे. आपण कर्मानेंच बांधले गेलों आहोंत. किंबहुना 'कर्म' म्हणजे 'माया' अशीही कर्माची व्याख्या करतात. कर्म तीन प्रकारचें असतें:—

१ **संचित**—गव्हांचें भरलेलें पोतें—जें अनेक जन्मांपासून आपण सांठवून ठेविलें आहे तें.

२ **प्रारब्ध**—सुपांत मापून घेतलेले गहूं—जें हा जन्म घेतांना संचितांतून काढून घेऊन उपभोगीत आहोंत तें.

३ **क्रियमाण**—जें आपण या जन्मीं करूं व जें संचितांत जमेस पडेल तें:

पैकीं 'प्रारब्ध' कर्म भोगानेंच क्षय पावतें; त्यावर आपली कांहीं सत्ता नसते. मात्र 'संचित' व 'क्रियमाण' हीं दोन्हीही 'ज्ञान' झालें असतां लय पावतात. 'द्विविधान्यणि कर्माणि ज्ञानाग्निर्दहति क्षणात्' (३-४५)

वरील कर्मांचें विवेचन ज्या पद्धतीनें बुधजन करितात, तसें मीं केलें आहे व श्री बाबांनींही तेंच अनुसरलेलें दिसतें. पण ज्ञानोत्तर 'संचित' व 'क्रियमाण' दोन्हीही नाहींशीं कशीं होतात ? ज्ञानोत्तर केलेलें कर्म 'क्रियमाण' हें 'हतोदित' म्हणजे ज्ञानदग्ध होऊन निर्बीज होतें हें पटतें. तेव्हां तें 'संचितां'त मिळत नाहीं; पण 'प्रारब्ध कर्म'—सुपांतील गहूं—काढून घेतल्यावर जें 'संचित'—गोणत्यांतील गहूं—शिल्लक राहतें त्याची वाट काय ? याचें समर्पक उत्तर माझ्या वाचनांत आलेलें नाहीं. तेव्हां अनुमाननिर्णयच काढला पाहिजे. ज्ञान्याला 'संचित' जाणवत नसेलः पण ज्ञानोत्तर त्याला 'प्रारब्ध'ही तृणवतच असतेः म्हणून लोकदृष्ट्या त्याला कांहीं प्रारब्ध चुकत नाहीं: तो ज्ञानोत्तरही जिवंत असतोचः मग संचितच कसें चुकतें ? अर्थात् अनुमानावरून संचित ज्ञान्याला चुकत नाहीं असाच सिद्धांत बसतो. म्हणजे त्यांना तें भोगीपर्यंत पुनर्जन्म चुकत नाहीं: पण ते स्वतः ज्ञानी असल्यामुळें ते उन्मनी असतात. संचितानुरूप कांहीं जन्मतःच तर कांहीं कालांतरानें आपलीं उन्मनी अवस्था प्रकट करितात व आपलें ज्ञानोत्तर राहिलेलें 'संचित' ते

भूभारहरण व लोकोद्धार करून संपवितात. म्हणजे 'संचिता'मुळें जन्मास आलेले ज्ञानी हेच संत, अवतारी विभूति होत. ते स्वतः ज्ञानी असल्यामुळें प्रतिपरमेश्वरच होतः पण संचितानुसार देही बनून ते 'जनां मुक्तीचा मार्ग' दावून लोकोद्धार करतात हें त्यांचें विशेष होय. म्हणूनच 'सद्गुरु'ची योग्यता परमेश्वराहूनही श्रेष्ठ आहे व परमेश्वर सुद्धां त्यांचा अंकित बनतो.

"जीवन्मुक्तः स योगीन्द्रः केवलं मयि संगतः।
ब्रह्मादीनांच देवानां सवंद्यः स्याज्जगत् त्रये"

(५-१८)

अशी 'सद्गुरु'ची योग्यता असते.

हें विवेचन ज्ञान्याच्या दृष्टीनें झालें; पण आपल्यासारख्या सर्वसाधारण इसमांना तें पचायला भारी वाटतें: कारण 'संचितां'त काय लिहिलें आहे तें कळत नाहीं: व 'प्रारब्ध'च जर आपण 'दुःख पर्वताएवढें' असें भोगतों आहोंतः तर 'संचित' किती कठीणतर असणार ? व मग त्यांत आपण ह्या जन्मीं केलेलें 'क्रियमाण' कितीही चांगलें असलें तरी–अशी काय भर टाकणार कीं, जेणें करून पुढील जन्म आपणास चांगला येईल ? असा निराशावाद साहजिक उत्पन्न होतो: व मग बहुजन मनमानेल तसे वागतातः विचारापेक्षां विकारवश होतात व मोक्षाला दुरावतातः तेव्हां त्यांना विचारक्षम बनवून आत्मशुद्धीकडे त्यांची प्रवृत्ति होईल अशा रीतीनेंच त्यांना मार्ग दाखविला पाहिजेः व माझ्या मतें 'संचित,' 'प्रारब्ध' व 'क्रियमाण' यांचें जरा निराळें वर्गीकरण केलें असतां असा मार्ग मिळेल; 'माझ्या मतें' म्हणण्याचें कारण दुसरें कोणी असें सुचविलेलें माझ्या वाचनांत आलें नाहीं हें होय.

निसर्गनियम असा आहे कीं, सालमजकूरच्या पिकाचें जे धान्य तयार होतें, तेंच पुढील सालच्या 'बीं'-पेरणीस उपयोगी पडतें. आदल्या वर्षाचें सांठीव धान्य उपयोगी पडत नाहीं व हाच सिद्धांत मी माझ्या दृष्टया 'कर्म' विवेचनास लावतों; आपण जन्मतः **सर्वच** 'संचित' बीजरूपानें बरोबर घेऊन येतों व त्याची पेरणी करतों; तें पेरणें व त्याची मशागत करणें–म्हणजे जे आपण जन्मभर करतों तें–हें 'प्रारब्ध' होय. ह्या 'प्रारब्धा'नें जें आपण पीक काढतों तें 'क्रियमाण' होय व तेंच पुढील जन्माचें 'बीजरूप' संचित होय. तेव्हां जें कांहीं आपण ह्याच जन्मीं करूं त्याचेंच–आणखी कशाचेंही नाहीं–फळ आपणांस जन्मोत्तर बीजरूपानें मिळेल. आतां आपण हा जन्म तर घेतला आहे. तेव्हां जर पुढील जन्म नको असेल–मोक्ष हवा असेल–तर त्या पेरणीपासून होणारें पीक–क्रियमाण, कीं जें जन्मोत्तरचें बीजरूप संचित होतें–तेंच नष्ट केलें पाहिजे; कारण 'बीज तसे दाणें' हा निसर्गनियमच आहे. त्या-

करितां हें कर्मबीज काय आहे हें कळलें पाहिजे, तर तें 'सवासनम्' हें आहे. म्हणजे वासना हेंच तें बीज होय.

## २ गहूं भरडून पीठ करणें

'अनोऽसक्त तया भूप कर्तव्यं कर्म जंतुभिः ।

सक्तोऽगति मवाप्नोति मामवाप्नोति तादृशः ॥'' ( २-१९ )

कर्म कोणालाच सुटत नाहीं: 'कदाचिदक्रियः कोऽपिक्षणं नैवाव तिष्ठते ।' ( ३-४ ) आपला जन्म हेंच जर कर्म, तर जन्म सुटेपर्यंत मोक्ष मिळेपर्यंत कर्म कसें सुटणार ? आपण जन्मतः प्रारब्धाची पेरणी केलीच आहे. तेव्हां ती गळ्यांतच पडली आहे. ती निस्तरली ही पाहिजेच. मग तुम्हीं तिची मशागत करा, पीक टाकून द्या, कीं दाणा भरडून काढा; पण कांहीं तरी तुम्हांला केलें हें पाहिजेच; 'केल्यावीण कांहींच नाहीं।' तिची मशागत केलीत–सकाम कर्म केलेंत–कीं त्यापासून बीजरूप संचित तयार होणारच. त्यानें पुनर्जन्म कांहीं चुकत नाहीं. तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष केलेंत–कर्मसंन्यास केलात, तरी दुर्लक्ष करणें हें सुद्धां एक प्रकारचे कर्मच आहे; व त्यांत 'मी दुर्लक्ष करतों' ही भावना--वासनाबीज--हें शिल्लक राहतेंच; म्हणजे त्यानें 'कर्म' सुटत तर नाहींच, आणि 'वासनाबीज' क्षय पावतें असेंही नाहीं. म्हणजे तुम्हांला 'फळ' जें मोक्ष तें मिळत नाहींच. कारण फळ तर त्यालाच म्हणावें, कीं ज्यानें दुःखाचा नाश होतो किंवा सुख तरी प्राप्त होतें. परंतु 'मला अमुक कर्तव्य केलें पाहिजे' असा कर्तव्य शेष जोंवर आहे, तोंवर दुःख संपणें नाहीं, व सुख होणें नाहीं '' (–**श्रीदत्तभार्गवसंवाद**) मग 'फळ' मोक्ष–कसें मिळवावें ? तर गहूं भरडून बीजनाश करूनच. गहूं भरडणें हें सुद्धां कर्मच; पण त्याचें फळ काय, तर पीठ; मग हें पीठ किती जरी पेरलें, तरी त्यापासून गहूं थोडेच पिकणार आहेत! म्हणजे वासनाबीजाचा नाश झाला, कीं पुनः पेरणी करावयाची ? अर्थात् मोक्ष–जें अंतिम फळ--सहजांत मिळतोच. हें वासनाबीज नाश कसें करावयाचें ? तर 'असक्ततयाः' निष्काम कर्म करून; कर्मसंन्यास करून नव्हे. 'फलाशेचा पूर्ण विराम । काम्यत्यागाचें हेंच वर्म । '' ( १–१०० )

**जातें**:—'' सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें। परि तेथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे ॥ '' (–श्री रामदास )

निष्काम कर्म करूनच कर्मबीजाचा नाश करावयाचा हें ठरलें; हें ध्येय झालें: पण तें कसें गांठावयाचें ? त्याला भिन्न मार्ग आहेतः 'अतिदुःखंच वैराग्यं भोगाद् वैतृष्ण्यमेवच गुरुप्रसादः सत्संग उपायास्तज्जये अमी ॥ ( ५–२२ ) हे इतके उपाय आहेत; मग त्यांतील उत्तम कोठचा, तर भक्तिमार्ग ! 'जरी तुज व्हावा देव । तरी हा सुलभ उपाव ॥'

(-**श्रीतुकाराम**)भक्तिमार्ग कसा असावा? तर जांत्यासारखा. 'सबुरी व निष्ठा' ह्या जांत्याचीं दोन तळीं: पैकीं 'सबुरी' ही खालची स्थिर तळी: 'धीरसो गंभीर। उतावळेसा बावरा॥' हें तिचें लक्षण: व 'निष्ठा' ही वरची तळी: वरची तळी फिरवूनच-'निष्ठा' दृढ करूनच-गव्हांचें पीठ होतें—कर्मबीज नाश पावतें. जांतें तयार झालें: 'सबुरी व निष्ठा' मिळाली: पण खुंट्याशिवाय जांतें फिरणार कसें ? खुंटा हा हवाच व तोही 'ठोकून घट्ट केला' पाहिजे. कां ? तर 'व्हावा न ढिला दळणांना।' ( १-११२ ) शिवाय एका वेळीं एका जांत्याला एकच खुंटा बसतो व तो खुंटा वरील तळीचा—निष्ठेचा-फिरण्याचा मार्ग रोखतो व त्यानुसार ती तळी फिरते: तसेंच खुंटा वरच्या तळीलाच—निष्ठेलाच-बसवितात. हा खुंटा कोण, तर सद्गुरु ! ! एक गुरु करावा: तो जो मार्ग दाखवील तो धरावा -त्या दिशेनें जांतें फिरवावें व 'निष्ठा-सबुरी' जांत्यांत 'अस्तन्या वर करून' खुशाल 'प्रारब्ध' वैरा रिचवावा: कीं गहूं भरडून 'पीठ' आपोआप होतें: कर्मबीज नाश पावतें: अर्थात् जन्म-मरणाचे फेरे चुकतात: महामारी थांबते व मोक्ष मिळतो.

**५ 'आल्या रांडा फुकटखाऊ'** ( १-१३० )

" जन म्हणती माया लटकी। परी ती आहे महा चेटकी॥" ( ३९-८० )

येथें 'रांडा' या शब्दाचा मी 'वेश्या' असा अर्थ करतों. वेश्या 'फुकटखाऊ' असते. ती 'लुटाया धावूं धावूं' येते. आपणहून गळीं पडते व जो तिच्या मोहपाशांत पडतो, त्याला ती विवेकबुद्धि, देह, अब्रू, धन व गृहसौख्य या क्रमानें सर्वस्वी लुटते. अगदीं 'विकून' खाते, व त्याच्या स्वत्त्वाचा व सर्वस्वाचा नाश करिते.

जीवात्म्याचें गृहसौख्य कोणतें, तर मोक्ष. पण या 'माया'रूपि वेश्येनें त्याला आपल्या नादीं लावलें आहे. जन्मतःचा जीव मायेंत गुरफटला आहे. तेव्हां आतां त्याला तिच्या पाशांतून स्वतःला सोडवून घेतलें पाहिजे.

स्थूलत्त्वानें ज्ञानी, अज्ञानी, व 'मुमुक्षु' ( ज्ञानेच्छु-अज्ञानी ) असे लोकांचे तीन भेद करतां येतील.

१ ज्ञानीः-"मुक्तसंग योगी राणा। स्वच्छंद धरी प्राणा। देव तच्चरणा वंदिती॥

( —**श्रीदत्तमहात्म्य ३३-९९** )

अशी त्याची स्थिति असते. तो 'स्थितप्रज्ञ' असतो. तो जीवन्मुक्त असल्यामुळें त्याला 'माया' कांहींच करूं शकत नाहीं. तो 'मायातीत' असतो. त्यामुळें त्याचा प्रश्नच उरत नाहीं.

२ **अज्ञानीः** भक्तिहीनोऽश्रद्दधानः सर्वत्र संशयी तुयः। तस्य शं नापि विज्ञामिहलोकोऽथ वा परः॥ ( ३-४८ )

तो स्वत्त्व गमावून मायेला सर्वस्वीं विकलेला असतो. विष्ठेंतील किड्यांना जसा वीट येत नाहीं, तशी त्याची स्थिति असते. तो खरा 'प्रज्ञाहत' असतो. त्याला 'तत्त्वज्ञान' सांगणें म्हणजे ' गाढवापुढें गीता गाणें' होय.

३ **मुमुक्षु**–तो भक्ति, ज्ञान, कर्म, योग यांपैकीं कोणत्या तरी मार्गानें कळत वा नकळत मोक्षाकडे जात असतोः किंवा "एकदा कां तो मार्गांत पडला, कीं चरकांत घातल्याप्रमाणें परमेश्वरच त्याला पुढें पुढें खेंचीत असतो"(–**श्रीगीतारहस्य**) अशा स्थितींत त्याला मायेचा फोलपणा पटला, कीं तो 'जिज्ञासा'पूर्वक आपलें 'गृह-सौख्य'–मोक्ष–मिळविण्याच्या खटपटीस लागतोः तो 'योगी' बनतोः अर्थात् मायेला हें पाहवत् नाहींः ती 'चेटकी' त्याला निरनिराळीं आमिषें दाखवून ध्येयच्युत करूं पाहते. योग्याला ध्येयच्युत करणाऱ्या—मोक्षाला दूरावणाऱ्या–जर कुठल्या 'रांडा' असतील तर त्या 'सिद्धि' होत.

" सिद्ध होऊं येतां योग । तेव्हां येती उपसर्ग ! "
" अभ्यास टाकी योगी मग ! करी व्यासंग सिद्धीचा " ५१ ॥
" जरी सिद्धीकडे फिरे । तरी योग अंतरे ।
मग ध्यान नुरे । व्यर्थ फिरे योगी तो " ५२ ॥
" जरी जिंकेल आसन । स्वाधीन केला पवन ।
तरी सिद्धि पाहून । योगी फसून जातसे " १०४ ॥
" विलासी पुरुष जसा । विलासिनीला भुले तसा ।
सिद्धि पाहतां योगी सहसा ! भुले अभ्यास सोडुनी " १०५ ॥
" तरी सावधान होऊन । सिद्धि द्याव्या सोडून ।
आपलें जें ध्यान । तेंचि साधन अचूक राखावें " १०७ ॥
" सिद्धींचें जें फळ । तें असे निष्फळ । म्हणूनि चित्त
करूनि विमल । ध्यानीं निश्चल असावें " १०८ ॥

[ —**श्रीदत्तमहात्म्य अ. ३३ .** ]

" धांवता धांवता **बाया** थबकल्या ।
चौघी लगबगा मशिदीं चढल्या ॥ १–"११८
" पहिली अणिमा दुसरी महिमा । तिसरी होय गरिमा ।
चवथी सिद्धि लघिमा । देहसिद्धि ह्या चार ॥ ॥ ८॥
" प्राप्ति पांचवी प्राकाम्य सहावी । इशता सिद्धि सातवी ।
वशिता जाण आठवी । बरवी विघ्न संपती आठवी हे ॥ ॥ ९ ॥

" ह्या अष्ट महासिद्धि । दहा असती उपसिद्धि ।
ह्या वायाच उपाधी । येथें बुद्धि न ठेवावी ॥ २४ ॥

(—श्रीदत्तमहात्म्य अ. ३४)

तेव्हां 'बाया' ह्या अष्टमहासिद्धि व उपसिद्धि व चौघीजणी ज्या त्यांपैकीं वर चढल्या व 'जाऊनि बाबांचे हातां झोंबल्या । खुंटा घेतला हिमकोनी ॥' त्या पहिल्या चार देह सिद्धि होत.

**'बाबा त्यांसव भांडती ।'** ( १—११९ )

" संसृतीनां महाचक्र कामितव्य विचक्षणैः " ॥ ( २-१६ )
" देव या सिद्धि देती । योगी तया भुलती ।
ते संकटीं पडती । तया गती न होय ॥
" जातां राजदर्शना । पाहतां पदार्थ नाना ।
तेथें रमवितां मना । राजदर्शना मुकती ॥
" येथेंही तेच गती । जे सिद्धि पाहती ।
तेथें जरी भुलती । ते मुकती आत्मदर्शना ॥
" इकडे तिकडे न पाहे । तो न फसे मोहे ।
तो न घे सिद्धि फळहे । तो पाहे स्वात्मया ॥
" ईश्वरावर भरंवसा । ठेवूनि करितां अभ्यासा ।
तो न फसे तसा । अभक्त जसा फसतो ॥ "

(—**श्रीदत्तमहात्म्य, अ ३३**, ओ. ७९-८३ )

मुमुक्षु एकदा कीं सिद्धींच्या नादीं लागला कीं त्याची ' घसरगुंडी झालीच; पण जो त्या 'फुकटखाऊ रांडा' आपल्याला 'लुटाया आल्या आहेत' हें ओळखून त्यांची निर्भत्सना करून त्यांच्याशीं भांडतो, आपले गहूं-स्वत्व-हक्काचे आहेत; त्या 'रांडांचा' बाप जो अज्ञान तमदेहाहंकार-त्याचे 'कर्जाऊ' घेतलेले नाहींत हें ओळखतो, तोच स्वत्व-आत्मज्ञान-मिळवून 'गृहसौख्य'-मोक्ष-मिळवितो व त्यानंतर-आधीं नव्हे-नव्हे-'गालांत हंसून' त्यांना 'एकसरा दळूं' देतो; त्या 'लीला 'वानिती' । व 'गीतें गाती' ॥ पण शेवटीं गहूं दळून झाले म्हणजे त्यांना फाक्या मारीत ठेवून 'पीठ' त्यांच्याकडूनच 'शिवेवरी नेऊन' टाकवितो; त्यांना देत नाहीं. म्हणजे ज्ञान होण्यापूर्वी जितकें म्हणून त्या सिद्धींनीं त्याला छेडलें, त्याच्या सवाई तो त्यांचें उट्टें काढितो व 'जसें करावें तसें भरावें' हा धडा त्यांना शिकवितो.

हा एवढा 'बोध' ह्या लहानशा कथेंत आहे. त्यावरून श्रीबाबांच्या क्षुल्लक कृतीसुद्धां किती अर्थपूर्ण असत हें चांगलेंच विशद होतें. 'गावांत होती मरीची सांथ। करिती हा तोडगा साईनाथ ॥' १-१२६ एवढाच त्यांत मुद्दा नाहीं; तर त्यांत हेतुपुरस्सर सबंध 'संसृतीचें चक्र' उलगडलें आहे.

आतां मरीची सांथ उद्‌भवली ही संधि घेऊन बाबांनीं तें उलगडलें कीं, तें कळण्यासाठीं योगबळानें बाबांनीं महामारी उत्पन्न केली हें कळणें आपल्या आटोक्या-बाहेरचें आहे. 'तेथें पाहिजे जातीचें।' तत्त्वदृष्ट्या नाटककर्ता जसा नायक व खल-नायक हीं पात्रें स्वतःच निर्माण करतो, तसेंच येथें आहे. विघ्नकर्ता व विघ्नहर्ता असा हा श्रीसाई गजाननच आहे.

श्री पार्वतीमातुःश्रीनें म्हणे अंगाची मळी काढून सहजांत मूर्ति बनविली व तीच पुढें श्रीगणेश अवतार झाली. येथेंही तेंच झालें आहे. ह्या कथेमुळेंच श्री 'हेमाडपंता'ला 'सच्चरित' लिहिण्याची 'स्फूर्ति' झाली; तेव्हां त्यानें सहजांत ती कथा प्रथमाध्यायांत घेतली; पण त्याचाच हा आतां 'निरीक्षण'—लंबोदर प्रकटला.

श्रीज्ञानेश्वरांनीं 'ज्ञानेश्वरी'च्या आरंभीं षड्‌भुज गजानन आत्मज्ञानार्थ नमिला आहे. येथेंही 'सच्चरिता'च्या प्रथमाध्यायांतच श्री साईगजानन षड्‌भुज असाच प्रकटला आहे. तेव्हां त्याला नमन करूं: म्हणजे पुढील 'निरीक्षण' निर्विघ्न होईल.

## भूपाळी

साई गजानना, उठीं रे, दत्ता दयाघना। माझ्या दत्ता दयाघना।
सुप्रभात मंगल, करितों मी सद्‌भावें वंदना। साई गजानना ॥ ध्रु० ॥
'माहामारी' हा, 'काळ' निर्दाळी, 'परशु'ला घेऊन उठीं रे।
'परशु'ला घेऊन ॥ 'सिद्धि–माया' 'रांडा' धरि ह्या, 'पाशीं' आकळून ॥
साई गजानना० ॥ १ ॥

'भक्ति–चाती' 'कर्म–गहूं' हे, टाकी भरडून, उठीं रे।
टाकी भरडून ॥ 'दंत' रूपी 'गुरु' त्या 'खुंटा' 'बळकट ठोकून' ॥
साई गजानना ॥ २ ॥

'कर्म-चक्र-वेदांत' उकलवी, 'कमल'चि त्या खुण, धरी रे।
कमलचि त्या खूण ॥ मोक्ष ह्याची 'मोदक' देई दाउनि विज्ञान ॥
साई गजानना० ॥ ३ ॥

सद्भक्तां स्तव, ' वरद हस्त ' हा, ठेविला राखून जरी रे ।
ठेविला राखून ॥ चुकतों मी तरी, देई मज तो, व्हाया भवतारण ॥
साई गजानना ॥ ४ ॥

प्ररब्रह्म नि,-र्गुणची त्याचें, रूपचि तूं सगुण । दयाळा ।
रूपचि तूं सगुण ॥ ' बळवंत'-पदीं 'सुंदर' नमितों, साई गजानन ॥
साई गजानना ॥ ५ ॥

॥ इति प्रथमाध्याय 'निरीक्षण'म् ॥
श्रीगुरुचरणार्पणमस्तु ॥

---

टीपः-श्रीज्ञानेश्वरांनीं षड्भुज गजाननाच्या हातांत 'परशु, पाश, दंत, कमळ, मोदक व वरदहस्त' हीं आयुधें कल्पिलीं आहेतः त्यांचाच पर्याय अनुवाद वरील 'भूपाळीं'त केला आहे.